




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. १० मार्च २०२६








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १०३ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com





# युद्धाचा शेवट आम्ही ठरवू : इस्लामिक गार्डचे प्रत्युत्तर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

अमेरिका, इस्रायल आणि इराणमध्ये गेल्या काही दिवसांपासून तीव्र संघर्ष सुरू आहे. यादरम्यान इराणच्या इस्लामिक रिव्हॉल्युशनरी गार्ड कोअर (IRGC)ने मंगळवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेल्या धमकीला जोरदार प्रत्युत्तर दिले. आयआरजीसीने युद्धाचा शेवट आम्ही ठरवू असे अमेरिकेला सुनावले आहे. दरम्यान अमेरिका आणि इस्रायलकडून इराणच्या ऊर्जा केंद्रांवर करण्यात आलेल्या हल्ल्यांमुळे हा संघर्ष अधिकच भडकण्याची चिन्हे आहेत.



इराणी सरकारी माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कोअरच्या प्रवक्त्याने डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधान निरर्थक असल्याचे म्हणत फेटाळून लावले आहेत. जर अमेरिका आणि इस्रायलचे हल्ले असेच सुरू राहिले, तर या प्रदेशातून एक लिटरही तेल साठाही निर्यात होऊ देणार नाही, असा इशारा इराणने दिला आहे. प्रादेशिक सुरक्षा ही एकतर सर्वांसाठी असेल किंवा कोणासाठीच नसेल असेही त्यांनी स्पष्ट कले. तसेच प्रवक्त्याने म्हटले की, जर तणाव अधिक वाढला, तर त्याचा परिणाम आखाती देशांमधून हेणाऱ्या तेल वाहतुकीवर होईल. ट्रम्प यांनी यापूर्वी इशारा दिला होता की, जर इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून होणारी तेलाची वाहतूक रोखण्याचा प्रयत्न केला तर युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका पूर्वीपेक्षा २० पट अधिक तीव्र प्रतिसाद देईल. ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहित म्हटले होते की, सहज उद्ध्वस्त करता येणाऱ्या ठिकाणांना लक्ष्य करेल, ज्यामुळे इराणला देश म्हणून उभे राहणे अक्षरशः अशक्य होऊन जाईल. अशी वेळ येऊ नये अशी आपण आशा व्यक्त करतो असेही ट्रम्प म्हणाले होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी इराणमधील लष्करी मोहिमेबाबत माहिती दिली. ट्रम्प म्हणाले की, इराणमधील अमेरिकेची लष्करी मोहीम मूळ नियोजित वेळेच्या खूप पुढे असल्याचे ट्रम्प म्हणाले होते. आतापर्यंत राबवलेली ही मोहीम पूर्णपणे यशस्वी मानली जाऊ शकते, तसेच ही कारवाई सुरूच राहिल असेही ट्रम्प म्हणाले. अमेरिकन लष्कराने इराणच्या ड्रोन उत्पादन केंद्रांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली असून या हल्ल्यांमुळे इराणकडून होणाऱ्या ड्रोन लाँचिंगमध्ये ८३ टक्क्यांनी घट झाल्याचेही ट्रम्प म्हणाले.

अमेरिका आणि इस्रायलने इराणच्या फ्युल पायाभूत सुविधांना लक्ष्य केल्यानंतर इराणकडून हे वक्तव्य करण्यात आले आहे. इराणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की तेहरान आणि त्याच्या शेजारच्या अल्बोर्झ प्रांतातील तेल डेपोंना शनिवारी संध्याकाळी लक्ष करण्यात आले, ज्यामुळे रविवारी इराणची राजधानी तेहरानमध्ये भीषण आग आणि धुराचे लोट पाहायला मिळाले.

## इराणकडून दीर्घ संघर्षाची तयारी

इराणच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की देश दीर्घ संघर्षासाठी तयार आहे. आयआरजीसी प्रवक्त्याने सांगितले की, प्रवक्त्याने सांगितले की, इराणने बॅलिस्टिक आणि क्रूझ क्षेपणास्त्रे, ड्रोन आणि लढाऊ जहाजांचा मोठा साठा करून ठेवला आहे. इराण किमान सहा महिने सलग तीव्रतेने लढा देऊ शकतो. येणाऱ्या काही दिवसांत इराण युद्धाची नवी रणनीती वापरणार असून, अधिक प्रगत आणि लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे तैनात करण्याची योजना आखत असल्याचेही त्यांनी नमूद केले. इराणच्या रेड क्रिसेंट सोसायटीनुसार, अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांमुळे इराणमधील १३३२ लोकांचा मृत्यू झाला आहे. तसेच ९६६९ नागरी इमारतींचे नुकसान झाले आहे, यामध्ये हजारो व्यावसायिक इमारती आणि घरांचा समावेश आहे.

## थोडक्यात...


### अजित पवार विमान अपघात प्रकरणी रोहित पवारांचा आरोप

मुंबई (समर्थ गांवकरी) : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघात प्रकरणात राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून (सीआयडी) व्हीएसआर कंपनीचे संचालक व्ही. के. सिंग यांची चौकशी करण्यात आली. या चौकशीतून कोणती माहिती समोर आली, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, आता रोहित पवारांनी पुन्हा एकदा गंभीर आरोप केला आहे. अजित पवारांचं विमान लँड होत असताना दृष्यमानता कमी होती, तरीही व्ही. के. सिंग यांनी विमान लँड करण्याचा सल्ला दिल्याचा दावा रोहित पवारांनी केला. रोहित पवार म्हणाले, जोपर्यंत सीआयडीकडून अधिकृत स्टेटमेंट येत नाही किंवा व्ही. के सिंग माध्यमांसमोर येऊन काही सांगतील तेव्हा आम्ही पुराव्यानिशी उत्तर देऊ. विमान उड्डाणादरम्यान जेव्हा दृष्यमानता तीन हजाराच्या आसपास होती, तेव्हा कॅप्टन कपूर यांनी व्ही. के सिंग यांना फोन केला होता. दृष्यमानता कमी असल्याने टेक ऑफ करु शकत नसल्याचं त्यांनी सांगितलं. मात्र, तरीही व्ही. के. सिंग यांनी टेक ऑफ करायला सांगितलं", असा आरोप रोहित पवारांनी केला आहे.

### अहिल्यानगरमध्ये 16 पथके

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) : जिल्ह्यातील एलपीजी गॅस गोदामांची विशेष पथकांमार्फत तपासणी करण्याची तसेच कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पुरवठा विभागाला दिल्या आहेत. सध्याच्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉग. पंकज आशिया यांनी एलपीजी गॅस पुरवठ्याच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी आज, सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या. जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे, सहायक पुरवठा अधिकारी एम. के. चौधरी तसेच गॅस कंपन्यांचे अधिकारी व गॅस वितरक उपस्थित होते.

# श्रीवर्धन मध्ये भटक्या कुत्र्याचा लहान मुलावर हल्ला



**श्रीवर्धन: (समर्थ गांवकरी)**

श्रीवर्धन शहरात दिवसेंदिवस भटक्या श्वानांची संख्या वाढली असून, हे श्वान स्थानिकांना त्रासदायक ठरत आहेत.काही दिवसांपूर्वी महिलेच्या अंगावर श्वानांच्या टोळक्याने उडी घेत चावा घेतल्याची घटना ताजी असतानाच एका लहान मुलाला श्वानाने हल्ला केल्याची घटना नुकतीच घडली आहे. श्वानांची पैदास दर सहा ते सात महिन्यांनी होत असून , गेल्या काही वर्षांत शहरात असंख्य मोकाट श्वान भटकताना आढळतात.प्रत्येक पाखाडी , आळीत टोळक्याने बसलेले श्वान हे अनेक वेळा नागरिक , विद्यार्थी , ज्येष्ठ नागरिकांच्या मागे जात हातातील वस्तू ओढणे तसेच चावा घेण्याचा प्रयत्न करणे या प्रकाराने नागरिक त्रस्त झाले आहेत.त्यातही रस्त्याने एकट्या दुकट्या व्यक्तीच्या अंगावर उडी घेत चावा घेण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत.श्रीवर्धन तालुक्यात दिवसेंदिवस मोकाट श्वानांचा उपद्रव वाढला आहे. वर्षभरात १८७ जणांना श्वान दंश झाल्याने नागरिकांमधे दहशतीमुळे भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. श्रीवर्धन नगर परिषदेकडून मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण , शस्त्रक्रिया करण्याची मोहीम अनेक वर्षांपासून रखडल्याने दरवर्षी श्वानांची संख्या वाढती आहे.नगरपरिषद हद्दीत प्रत्येक नाका, चौकात श्वानांचे टोळके दिसून येते.श्रीवर्धन नगर परिषदेमार्फत भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे व शस्त्रक्रिया करणे याबाबतीत जाहीर निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती; परंतु कुठलीही प्राणिमित्र संघटना अथवा ॲनिमल वेल्फेअर एजन्सीने याबाबतीत पुढाकार घेतला नाही. मोकाट श्वान पकडण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी , त्यांना रेबीज लसीकरण करणे , निर्बिजीकरण करणे यासाठी निविदा काढण्यात येणार आहेत.लवकर अंमलबजावणी होईल असे श्रीवर्धन चे उपनगराध्यक्ष अनंत गुरव यांनी सांगितले. दरम्यान शहरी भागात भटके कुत्रे झुंड करून राहतात. रात्रीच्या वेळी हे शहरातील रस्त्यावर झुंडीने फिरतात. काळोखात येणाऱ्या जाणाऱ्यावर भुंकतात. वाहन चालकांच्या मागे लागतात. आणि आक्रमक होऊन बरेचदा लहान मुले, वृध्द माणसांवर हल्ले देखील करतात. त्यामुळे या भटक्या कुत्र्यांचे करायचे काय हा प्रश्न नगर पालिकांना पडला आहे. प्राणिमित्र संघटनांच्या दबावामुळे गेल्या काही वर्षात जिल्ह्यातील शहरीभागात कुत्र्यांचे निर्बिजीकरण मोहिमा राबविण्यात आल्या. मात्र या मोहिमांना फारसे यश मिळतांना दिसून येत नाही.

# १७ हजार पदांवर होणार तलाठी भरती, लवकरच जाहिरात येणार

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील हजारो उमेदवारांसाठी दिलासादायक बातमी आहे. गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित असलेली तलाठी भरती प्रक्रिया अखेर मार्गी लागण्याची चिन्हे दिसत आहेत. महसूल विभागाने राज्यात १७०० पेक्षा जास्त तलाठी पदे लवकरच भरून काढण्याचा निर्णय घेतला असून, या भरतीसाठी शासन स्तरावर हालचाली सुरू झाल्याचे शासनाच्या निर्णयानुसार, जिल्हानिहाय रिक्त जागांचा अहवाल तयार करण्यात येत आहे. आणि त्यानुसार पुढील भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. राज्य सरकारने मेघभरतीची घोषणा केली होती. त्याचाच भाग म्हणून ही भरती राहणार असल्याची माहिती आहे. कुठल्याही शाखेतील पदवीधर यासाठी अर्ज करू शकणार आहे. मात्र ही भरती एमपीएससी कडून होणार नसून पुन्हा एकदा खासगी कंपनीकडून होण्याची शक्यता आहे. यापूर्वी २०२३ मध्ये तलाठी भरती घेण्यात आली होती. या तलाठी भरती परीक्षेसाठी साडेअकरा लाखांपेक्षा जास्त उमेदवारांनी अर्ज भरले होते. छाननीअंती ४४६६ जागांसाठी दहा लाख ४१ हजार ७१३ असे विक्रमी अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी प्रत्यक्षात आठ लाख ६४ हजार ९६० उमेदवारांनी परीक्षा दिली. मोठ्या प्रमाणात अर्ज आल्याने ही परीक्षा तीन टप्प्यांत आणि दिवसातील तीन सत्रांत घेण्याचे निश्चित करण्यात आली होती. संपूर्ण परीक्षेत एकूण प्रश्नांपैकी २८३१ प्रश्नांवर १६ हजार २०५ आक्षेप उमेदवारांकडून नोंदवण्यात आले. या आक्षेपांपैकी एकूण वैध १४६ प्रश्नांसाठी घेतलेले ९०७२ आक्षेप परीक्षा घेणाऱ्या टीसीएस कंपनीकडून योग्य ठरवण्यात आले आहेत.

# एम. देवेंदर सिंह यांचे निलंबन अखेर मागे

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

सभागृहातील कामकाजाबद्दल पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांना माहिती देण्यासाठी अनुपस्थित राहिल्याने, निलंबित केलेले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंदर सिंह आणि सहसंचालक सतीश पडवळ यांच्यावरील कारवाई मागे घेण्यात आली. त्यांची मूळ पदावर नियुक्ती केली आहे. या कारवाईवरून सरकारवर टीका झाली होती तसेच अनिष्ट प्रथा पाडल्याचा आरोप झाला होता. विधानसभेत २७ फेब्रुवारी रोजी राजुरा-चंद्रपूर विभागातील औद्योगिक प्रदूषणाच्या संदर्भात उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेला पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे या उत्तर देत असताना प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी आपल्याला माहिती दिली नसल्याचे सांगितले. त्यावर विरोधी सदस्यांनी अधिकाऱ्यांच्या मनमानी व मुजोरीवर टीका करीत त्यांना



निलंबित करावे, अशी मागणी केली. त्यावर तालिका पीठासीन अधिकारी दिलीप लांडे यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव देवेंदर सिंह आणि सहसंचालक सतीश पडवळ यांना निलंबित करावे, असा निर्देश दिला. 'देवेंदर सिंह यांच्या विरोधात शिस्तभंगाची कारवाई केली असून, अखिल भारतीय सेवा (शिस्तभंग व अपील) नियमानुसार त्यांना त्वरित सेवेतून निलंबित करत असल्याचा आदेश महाराष्ट्र सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केला होता.

# लाडक्या बहिणी, बेरोजगारांना मिळणार ऑटोरिक्षा परवाने



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील वाढती वाहतूक कोंडी व शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी नवीन ऑटो रिक्षांना परवाना देण्यास स्थगिती देण्याबरोबरच ओला, उबेर, रॅपिडो कंपन्यांना देण्यात आलेले बाईक टॅक्सीचे तात्पुरते परवाने रद्द करण्याचा आल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी विधिमंडळाच्या उभय सभागृहांमध्ये केली. राज्यात आजमितीस १४ लाख आटोरिक्षा परवाने देण्यात आले असून खुला परवाना धोरणामुळे अनेक ठिकाणी एकाच घरात अनेक परवाने देण्यात आलेले आहेत, काही परवाने बांग्लादेशी नागरिकांना अवैध रितीने दिल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तसेच ग्रामीण भागात मुबल रिक्षांमुळे व्यवसाय होत नसल्याच्या तर शहरी भागात रिक्षांमुळे वाहतूक कोंडी आणि प्रदूषण होत असल्याच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच रिक्षा चालक संघटनांकडून सरकारकडे येत आहेत. यावर तोडगा सूचविण्याबात सरकारने केंद्र सरकारकडे विचारणा केली होती. त्यावर ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य शासनाकडे असून वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक लवचिकता देण्यात आली असल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने राज्य सरकारला कळविले आहे. त्याचप्रमाणे मोठ्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबतचा विषय स्थानिक परिस्थिती आणि वाहतुकीच्या गरजेनुसार राज्य सरकारने योग्य पद्धतीने हाताळण्याचा सल्लाही केंद्र सरकारने दिला आहे. त्यानुसार राज्यात आटोरिक्षा परवान्याबाबत नवीन धोरण आणण्यात येणार असून तोवर नव्या परवाना वितरणास स्थगिती देण्यात आली आहे. त्यानुसार ऑनलाईन परवाना व्यवस्थाही स्थगित करण्यात आल्याचे सरनाईक यांनी सांगितले. राज्यातील नागरिकांना अधिक चांगली आणि सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यापुढे सरसकट परवाने न देता केवळ गरजूंनाच परवाने दिले जातील.

## बाईक टॅक्सी परवाना रद्द

मुंबईसह परिसरात सुरू असलेल्या ई बाईक टॅक्सी सेवेला सरकारने लगाम लावला आहे. वाहतूककोंडीतून मार्ग काढण्यासाठी सोईस्कर ठरत असलेल्या ओला, उबेर, रॅपिडो कंपन्यांना देण्यात आलेले दुचाकी अथवा बाईक टॅक्सीचे तात्पुरते परवाने रद्द करण्यात येत असल्याचे सरनाईक यांनी जाहीर केले.

# हजारो कोटींच्या गायरन जमिनी पालिकांच्या घशात

## फडणवीस सरकारचा निर्णय

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपरिषदांच्या (नगरपालिका) क्षेत्रातील हजारो हेक्टर गायरान जमिनी आता राज्य शासनाच्या मालकीच्या होणार आहेत. या जमिनी स्थानिक स्वराज्य संस्थांना सार्वजनिक कार्यासाठी नि:शुल्क दिल्या जाणार आहेत. त्यासदंर्भातल्या महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या सुधारणेला सोमवारी विधानसभेने एकमताने मंजुरी दिली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुधारणा विधेयक विधानसभेत सादर केले. विधेयक सादर करताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, राज्यातील २९ महानगरपालिका क्षेत्रात ३ हजार ३७८ हेक्टर आणि २४७ नगरपरिषदांच्या (नगरपालिका) क्षेत्रात ४ हजार ५०९ हेक्टर अशी एकुण ७ हजार ८८७ हेक्टर गायरान जमीन आहे. पुणे महापालिका हद्दीत ८८६ हेक्टर गायरान जमीन आहे. या गायरान जमिनी विनावापर पडून आहेत. या जमिनींवर अतिक्रमणे होत आहेत. या क्षेत्रात गायीगुरे राहिलेली नाहीत. या गायरान जमिनी आता जिल्हाधिकारी यांच्या नावे होतील. स्थानिक स्वराज्य संस्थांनी मागणी केल्यानंतर त्यांच्याशी करार करुन त्या दिल्या जातील. या



गायरान जमिनी व्यावसायीक वापरासाठी वापरता येणार नाहीत. जमिनी अधिगृहीत करताना पोस्टाने नोटीस पाठवण्याचे बंधन होते, आता इलेक्ट्रॉनिक नोटीस पाठवण्यासही मंजुरी असेल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. या सुधारणा विधेयकाला सभागृहातील दोन्ही बाजुंच्या सदस्यांनी एकमुखी पाठिंबा दिला. तसेच हा नियम नगर पंचायत क्षेत्राला लागू करावा, अशी मागणी केली. मात्र नगर पंचायतींचा अद्याप विकास आराखडा (डीपी ) मंजूर झालेला नाही.

# अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात एचपीव्ही लसीकरण सुरू

## १४ ते १५ वयोगटातील मुलींना लसीकरण करण्यासाठी आवाहन

**अलिबाग : (समर्थ गांवकरी)**

महिला आणि मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असलेली ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस म्हणजे एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ राज्यस्तरावर रविवारी महिला दिनाचे औचित्य साधून करण्यात आला. अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयातही एचपीव्ही लसीकरण करण्यास सोमवारी (ता.९) सुरुवात करण्यात आली. आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यातील सर्व पात्र मुलींना ही लस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी किशन जावळे, राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी एचपीव्ही लसीकरण मोहिमेची तयारी, नियोजन,



विविध विभागामधील समन्वय, लसीकरण सत्रांचे नियोजन, मानव संसाधन उपलब्धता, कोल्ड चेन व्यवस्था तसेच जनजागृती मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित सर्व विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे महिलांमध्ये गर्भाशय मुख कर्करोगाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्याला अटकाव करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर व राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या पुढाकाराने १४ वर्ष पूर्ण झालेल्या पण १५ वर्षाखालील वयोगटातील मुलींना एचपीव्ही लस देण्यात येणार आहे. एचपीव्ही संसर्ग हा गर्भमुख कर्करोगाचा प्रमुख कारणीभूत घटक आहे. वेळेत लसीकरण केल्यास या आजारापासून मोठ्या प्रमाणात संरक्षण मिळू शकते. त्यामुळे किशोरवयीन मुलींचे लसीकरण हा प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय मानला जात आहे. सरकारच्या या निर्णयामुळे विशेषता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील कुटुंबाला मोठा दिलासा मिळणार आहे.

# आमदार श्रीकांत भारतीय यांनी पत्रकार व विक्रेत्यांच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले

## महामंडळे लवकरच कार्यान्वित होणार सरकारची ग्वाही

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

विधान परिषदेत आमदार श्रीकांत भारतीय यांनी राज्यातील वृत्तपत्र व पत्रकार आणि विक्रेत्यांच्या अडचणी सभागृहासमोर मांडत सरकारकडून तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्याची मागणी केली. त्यांच्या लक्ष वेधिवर सोमवारी सभागृहात सविस्तर चर्चा झाली आणि सरकारला याबाबत भूमिका स्पष्ट करावी लागली. मंत्री आशिष शेलार यांनी पुढील अधिवेशनापूर्वी पत्रकार व विक्रेत्यांसाठीचे महामंडळ स्थापन होईल आणि पत्रकारांचे प्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेऊन वृत्तपत्र क्षेत्राशी निगडित मागण्यांवर निर्णय घेतला जाईल अशी ग्वाही दिली. महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पी अधिवेशन मुंबईत सुरू आहे. सोमवार (९ मार्च) रोजी विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेद्वारे आमदार श्रीकांत भारतीय यांनी राज्यातील नोंदणीकृत वृत्तपत्रे, त्यात काम करणारे पत्रकार तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांसमोर विशेषता कोरोना महामारीनंतर उभ्या राहिलेल्या अडचणींचा मुद्दा उपस्थित केला.






भारतीय म्हणाले, माध्यम क्रांतीनंतर, समाजातील घडामोडी, बातमी, माहिती प्रश्न आणि शासनाच्या धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात वृत्तपत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अलिकडे डिजिटल माध्यमांचा विस्तार झाला असला तरी वृत्तपत्रांची विश्वासार्हता कायम आहे. मात्र कोरोना काळानंतर वृत्तपत्रांच्या खपात जवळपास ५० टक्क्यांपर्यंत घट झाली आहे. त्यामुळे या क्षेत्राशी संबंधित पत्रकार, कर्मचारी आणि वृत्तपत्र विक्रेते यांच्यासमोर आर्थिक आणि व्यावसायिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. लोकशाहीतील वृत्तपत्र व्यवस्था टिकण्यासाठी वाढण्यासाठी सरकारने जबाबदारी घेणे आवश्यक आहे. समाजात सगळेच बॅक टू बेसिक या भूमिकेत आलो असल्याने वृत्तपत्रांच्या बाबतीमध्ये सरकारने सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे. 10 ऑक्टोबर 2024 रोजी राज्य सरकारने पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली होती. मात्र ते अद्याप कार्यान्वित झालेले नाही. त्यामुळे हे महामंडळ नेमके कधी सुरू होणार आणि पत्रकार-विक्रेत्यांच्या इतर प्रलंबित मागण्यांवर सरकार कधी निर्णय घेणार, असा थेट सवाल भारतीय यांनी उपस्थित केला.

राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी सरकारकडे विविध मागण्यांसाठी पाठपुरावा केला असल्याचा उल्लेख भारतीय यांनी केला.

भारती यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले, आमदार भारतीय यांनी अत्यंत महत्वाच्या विषयाला हात घातला आहे. समाजातील घटना लोकांपर्यंत पोहोचविण्यात वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वाची असून लोकशाही व्यवस्थेत माध्यमांना चौथा स्तंभ म्हणून मान्यता आहे.

कोरोना महामारीनंतर या क्षेत्रात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती सरकार मान्य करते. त्यामुळे पत्रकार आणि विक्रेत्यांसाठी जाहीर केलेली महामंडळे पुढील अधिवेशनापूर्वी कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

तसेच पत्रकार संघटना, संबंधित विभागांचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत स्वतंत्र बैठक घेऊन प्रलंबित मागण्यांवर चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले. या चर्चेत आमदार संजय खोडके आणि सतेज पाटील यांनीही सहभाग घेत पत्रकार आणि विक्रेत्यांच्या अडचणींबाबत आपली मते मांडली. विधान परिषद उपसभापती निलम गोऱ्हे यांनीही चर्चेत हस्तक्षेप करत पत्रकारांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत सरकारने अधिक संवेदनशीलतेने विचार करावा, अशी सूचना केली. विशेषतः बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेतील वयोमर्यादा आणि सलग सेवेसंबंधीच्या अटींचा पुनर्विचार करून अधिकाधिक पत्रकारांना त्याचा लाभ मिळावा, यासाठी स्वतंत्र उपसमिती स्थापन करण्याचा विचार करावा, असे त्यांनी सुचविले.

### वसंत मुंडे यांचा विशेष उल्लेख

आमदार श्रीकांत भारतीय यांनी वृत्तपत्र पत्रकार यांच्या प्रश्नावर यदु जोशी व वसंत मुंडे यांनी पाठपुरावा केल्याचा उल्लेख केला.महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी दीक्षाभूमी नागपूर ते मंत्रालय मुंबई अशी सहा हजार किलोमीटर ची पत्रकार संवाद यात्रा काढून वृत्तपत्र काम करणारे पत्रकार आणि विक्रेते यांच्या समस्या वर आवाज उठवत सरकार समोर प्रश्न मांडले होते. ऐतिहासिक यात्रेमुळे सर्वसामान्यांचा आवाज असणाऱ्या माध्यम घटकाचे प्रश्न ऐरणीवर आले होते. त्यातून सरकारने पत्रकार व विक्रेत्यांसाठी महामंडळाची घोषणा केली होती. याचा सभागृहात आमदार श्रीकांत भारतीय यांनी विशेष उल्लेख केला.

दरम्यान, पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नांवर सभागृहात ठामपणे आवाज उठवल्याबद्दल आमदार श्रीकांत भारतीय यांच्या पुढाकाराचे माध्यम क्षेत्रातून स्वागत करण्यात येत आहे. त्यांच्या हस्तक्षेपामुळे हा प्रश्न विधिमंडळाच्या पातळीवर चर्चेला आला आणि सरकारकडून सकारात्मक भूमिका जाहीर करण्यात आली. सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार पत्रकार आणि विक्रेत्यांसाठीची महामंडळे कार्यान्वित झाली आणि प्रलंबित मागण्यांवर निर्णय झाले, तर राज्यातील माध्यम क्षेत्राशी संबंधित हजारो घटकांना त्याचा लाभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे श्रीकांत भारतीय यांचे पत्रकार संघटनांकडून अभिनंदन केले जात आहे.

## सामुदायिक विवाहात सहभागी होणाऱ्या प्रत्येक जोडप्याला डॉ.सोन्या पाटील यांच्याकडून १ लाखांची घोषणा


**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

आगरी समाज उन्नती मंडळ, भिवंडी तालुका आणि आगरी वधू-वर परिचय मंडळ, भिवंडी यांच्या संयुक्त विद्यमाने आगरी-कोळी समाजासाठी विनामूल्य वधू-वर परिचय मेळावा रविवारी (दि. ८ मार्च २०२६) उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. हा मेळावा किशोर आर. सी. पाटील आगरी समाज भवन, चरणीपाडा, राहनाळ, अंजूरफाटा, भिवंडी (जि. ठाणे) येथे आयोजित करण्यात आला होता.

बदलत्या सामाजिक परिस्थितीत युवक-युवतींना योग्य जोडीदार मिळावा तसेच पालकांना संवादाचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या मेळाव्यात एकूण १३४ वर पक्ष (मुले) आणि ७५ वधू पक्ष (मुली) यांनी सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. आगरी-कोळी समाजबांधवांनी या उपक्रमाचा उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली.





यावेळी डॉ. श्री. सोन्या काशिनाथ पाटील, अध्यक्ष – समाज कल्याण न्यास, महाराष्ट्र राज्य यांनी भिवंडी तालुक्यातील आगरी-कोळी समाजातील वधू-वरांसाठी एक महत्त्वाची घोषणा केली. सामुदायिक विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक जोडप्याला एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले. या घोषणेचे उपस्थितांनी स्वागत केले.


या उपक्रमाबद्दल आगरी समाज उन्नती मंडळ, भिवंडीचे अध्यक्ष नामदेव पाटील आणि सचिव रमेश कराळे यांनी त्यांचे आभार मानले.

## किनवट पोलिसांची मासरेड कारवाई

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध हातभट्टी दारू निर्मितीवर आळा घालण्यासाठी पोलिसांकडून सुरू असलेल्या मासरेड मोहिमेदरम्यान मोठी कारवाई करण्यात आली. दि. ०८ मार्च २०२६ रोजी पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली किनवट पोलिसांच्या पथकाने मौजे बोधडी बुद्रुक येथील जगन्नाथ बाबा माळ शिवारात छापा टाकला. या कारवाईत अंदाजे ६०० लिटर हातभट्टी गावठी दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे मोहफुल रसायन जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या मुद्देमालाची अंदाजे किंमत ३६ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक फडेवार, पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रदीप आत्राम, सिद्धार्थ वाघमारे, पोलीस कॉन्स्टेबल संजय रांजणे व पोलीस कॉन्स्टेबल डुकरे यांच्या पथकाने केली.

## ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी यांच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पिएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल येथे महिला शिक्षीका यांच्या सत्कार



**नवीन नांदेड: (समर्थ गांवकरी)**

ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी यांच्या वतीने पिएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल येथील कार्यरत महिला शिक्षिका यांच्या व किशोरवयीन मुलींचे समुपदेशन जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सरपंच सौ.संध्याताई विलास हंबर्डे व ऊपसरपंच सौ. अर्चना विश्वनाथ हंबर्डे यांनी आयोजित कार्यक्रम घेतला स्त्री रोग डॉ.अंबिका माटोरे यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने 7 मार्च रोजी पिएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी सरपंच सौ.संध्याताई विलास देशमुख व माजी ऊपसरपंच सौ.अर्चना विश्वनाथ हंबर्डे, यांनी जिल्हा परिषद हायस्कूल मधील किशोरवयीन मुलींचे समुपदेशन बाबत मार्गदर्शन स्त्री रोग तज्ञ डॉ.अंबिका माटोरे यांनी केले यावेळी शाळेतील शिक्षीका व शिक्षकेतर महिला कर्मचारी यांच्या सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सौ.उज्ज्वला जाधव तर सुत्रसंचलन अपर्णा देशमुख यांनी केले. चौदंते,चेरलेवार,रेवणवार,शेख ,गुंटूरकर ,धुमाळ ,कदंमवार ऊदवंत,हाते, भंडे,येवतीकर, सोळुंके,नाईनवाड, देशमुख,अनुजा पवार,बुरसे,लोणे, वैष्णवी शिंदे,पगडे,बोटमवाड, कोकाटे यांची व विद्यार्थीनी उपस्थित होते.

# ७५ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान; महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा उपक्रम उत्साहात!

**अकोलेत जागतिक महिला दिन उत्साहात; ७५ महिलांना सन्मानचिन्ह देऊन गौरव : विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा भव्य सन्मान सोहळा : महिला दिनानिमित्त सन्मानचिन्ह, साडी व संविधान देऊन महिलांचा गौरव!**













**अकोले : (समर्थ गांवकरी)**

जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व एन.के.टी. ट्रस्ट समूह यांच्या वतीने कर्तृत्ववान महिलांचा भव्य सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ७५ महिलांचा सन्मानचिन्ह, साडी तसेच विविध उपयुक्त वस्तू देऊन गौरव करण्यात आला. तर ११ महिलांना स्मृतिचिन्ह, विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती आणि संविधान देऊन विशेष सन्मान करण्यात आला. हा उपक्रम महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, दैनिक समर्थ गांवकरी व एन.के.टी. ट्रस्ट समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांना मानपत्र, साडी, हरिपाठ, मिठाई, पेन व किचन साहित्य देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, तालुक्यातील अनेक महिला गेल्या अनेक वर्षांपासून समाजकार्यात सक्रिय असून त्यांचा समाजासाठी मोठा वाटा आहे. अशा भगिनींचा सन्मान करण्याचे भाग्य आज आम्हाला लाभले आहे. समाजातील गरजू आणि अडचणीत असणाऱ्या कुटुंबांना मदत करण्यासाठी आपला ट्रस्ट सतत कार्यरत असून अनेक महिलांना वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

यावेळी संगीता साळवे, रेखाताई कोटकर, अस्मिता पिसाळ, वंदना बांगर, संगीता धुमाळ, नयना पांडे, सुनिता उगले, मंदा नायकवाडी, स्वाती ताजणे, गावंडे मॅडम तसेच मंगल गावंडे आदी महिलांचा सन्मान करण्यात आला. डॉ. आरोटे पुढे म्हणाले की, एखाद्या कुटुंबात कोणी आजारी असल्यास किंवा संकटात सापडल्यास ट्रस्टच्या माध्यमातून शक्य ती मदत करण्यात येईल. देवठाण येथे बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या मुलीच्या कुटुंबालाही पन्नास हजार रुपयांची मदत करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी संगीताताई साळवे या समाजातील महिलांच्या सुखदुःखात नेहमी धावून जाणाऱ्या कार्यकर्त्या म्हणून त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी त्यांचे कौतुक करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. जागतिक महिला दिनानिमित्त संपूर्ण देशात महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव केला जातो. देशाच्या सर्वोच्च पदावर राष्ट्रपती म्हणून द्रौपदी मुर्मू यांना संधी मिळाल्याने भारतीय महिलांचा सन्मान उंचावला आहे. आज महिला शिक्षण, उद्योग, प्रशासन, सामाजिक क्षेत्र अशा सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत, याचा आम्हाला अभिमान आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी अशा प्रकारचे प्रेरणादायी उपक्रम राबवले जातात.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका अध्यक्ष अशोक उगले, इगतपुरी तालुका अध्यक्ष पोपट गवांदे, निखिल भांगरे, नामांकित उद्योजिका निशा मोरे, आशा वर्कर्स संघटनेच्या संगिता साळवे ग्रामपंचायत संगणक ऑपरेटर रेखाताई कोटकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारा हा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्यावतीने जागतिक महिला दिन साजरा !






**ओतूर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने राज्यभर विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात असून समाजातील विविध घटकांना प्रोत्साहन देण्याचे काम पत्रकार संघ करत असतो. त्याच धर्तीवर जुन्नर तालुका पत्रकार संघाच्या वतीने ओतूर येथे जागतिक महिला दिनानिमित्त एक आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. समाजासाठी निस्वार्थपणे काम करणाऱ्या ओतूर ग्रामपंचायतीतील महिला सफाई कामगारांचा साडी व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे कार्यक्रमाला विशेष उत्साहाचे वातावरण लाभले.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या डॉ. छाया तांबे तसेच पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते महिला सफाई कर्मचाऱ्यांचा साडी व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. समाजाच्या स्वच्छतेसाठी आणि आरोग्यासाठी रोज कठोर परिश्रम करणाऱ्या या महिला कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव केल्यामुळे उपस्थितांकडून या उपक्रमाचे विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी सौ. शोभा फाले, सौ. उज्वला सोनवणे, सौ. वैशाली जाधव, सौ. माळवे, सौ. वैशाली सरोदे, सौ. पुनम अस्वार, सौ. अनुसया गायकवाड, सौ. साधना अस्वार, सौ. मालती अस्वार, सौ. अनिता कदम या महिला सफाई

**ग्रामपंचायतच्या महिला सफाई कामगारांचा साडी व सन्मानचिन्ह देऊन गौरव!**

कर्मचाऱ्यांचा साडी व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच नुकत्याच निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्या डॉ. छाया तांबे यांचाही महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने सन्मान करण्यात आला. या प्रसंगी बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी पत्रकार संघाच्या कार्यपद्धतीबाबत मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, "महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ हा समाजाभिमुख उपक्रम राबविणारा संघ आहे. आमचा पत्रकार संघ देणाऱ्यांचा संघ आहे, घेणाऱ्यांचा नाही. समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. पत्रकार संघामध्ये केवळ गर्दी नको, तर समाजासाठी काम करणारे दर्दी कार्यकर्ते हवेत." त्यांनी महिलांच्या कार्याचे कौतुक करत समाजातील त्यांच्या योगदानाची दखल घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख सुभाष डोके, ज्येष्ठ पत्रकार दादा रोकडे, माजी तालुकाध्यक्ष राजेश डोके, नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष नयन डुंबरे, संपर्कप्रमुख रवी गजे, विकास घडगे, सुदर्शन मंडले, शौकत शेख, किरण पानसरे, वैभव सस्ते, रंजना घोलप, प्रवीण कर्डिले यांच्यासह अनेक पत्रकार आणि मान्यवर उपस्थित होते.

सन्मान सोहळ्यानंतर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या जुन्नर तालुका कार्यकारिणीची निवड प्रक्रिया पार पडली. त्यामध्ये राजेश डोके यांची जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी निवड करण्यात आली. तसेच सौ. रंजना घोलप यांची महिला तालुका अध्यक्षपदी, रवी गजे यांची तालुका संपर्कप्रमुखपदी पुनर्नियुक्ती करण्यात आली. याशिवाय शौकत शेख यांची तालुका उपाध्यक्षपदी, सुदर्शन मंडले यांची तालुका सचिवपदी आणि वैभव सस्ते यांची तालुका संघटकपदी निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार रंजना घोलप यांनी उत्कृष्टपणे केले, तर उपस्थित मान्यवरांचे आभार रवी गजे यांनी मानले. पत्रकार संघाच्या वतीने आयोजित या उपक्रमामुळे महिला कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळाले असून समाजातील विविध स्तरातील महिलांच्या कार्याचा सन्मान करण्याची परंपरा पुढेही कायम ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## 'महिला सक्षमीकरण' विषयावर प्रबोधन सभा

**पालघर : (समर्थ गांवकरी)**



स्वातंत्र्य सैनिक रेवजीभाई चौधरी सामाजिक प्रतिष्ठान, खरवंद यांच्या वतीने सारसून परिसरातील जांबचापाडा या आदिवासी दुर्गम भागात जागतिक महिला दिनानिमित्त 'महिला सक्षमीकरण' या विषयावर प्रबोधन सभेचे आयोजन करण्यात आले. रविवारी (दि. ८) दुपारी १२ ते २ या वेळेत पार पडलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वातंत्र्यवीर रेवजीभाई चौधरी तसेच क्रांतीसूर्य सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच सौ. सुशीला किसन घाटाळ होत्या. या वेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व संस्थापक विष्णू रेवजी चौधरी यांनी आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणाबाबत मार्गदर्शन करत महिलांनी शिक्षण, स्वावलंबन आणि सामाजिक सहभागातून आपली भूमिका अधिक सक्षम करावी, असे आवाहन केले. प्रतिष्ठानचे सचिव नारायण शेंडे यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व आणि समाजातील स्त्रीशक्तीचे योगदान यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमात परिसरातील महिलांचा शाल व पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये अंगणवाडी सेविका सौ. गुलाबताई सुभाष जंगली, मदतनीस सौ. सुशीला किसन घाटाळ, माजी सरपंच सौ. राही चिंतामण जंगली, सौ. चांदनी मोरे यांच्यासह अन्य महिलांचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी जांबचापाडा व सारसून परिसरातील महिला, ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रतिष्ठानचे संस्थापक विष्णू चौधरी, सचिव नारायण शेंडे, सामाजिक कार्यकर्ते गोविंद अवतार तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी व समिती सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित महिलांना बुंदी, पापडी, केळी व सरबताचा अल्पोपहार देण्यात आला. नारायण शेंडे यांनी आभार मानले. कार्यक्रम उत्स्फूर्त वातावरणात पार पडला.

## इको गाडी खड्ड्यात कोसळली

**डांग, गुजरात : (समर्थ गांवकरी)**

डांग जिल्ह्यातील सापुतारा ते वघई या आंतरराज्यीय महामार्गावर आज एक मार्ग अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार साकरपातळ येथून महाराष्ट्रातील भांडणा गावाकडे जात असलेली इको गाडी अचानक अपघातग्रस्त झाली. इको गाडी क्रमांक MH-15 KK-7863 सापुतारा–वघई मार्गावरील शामगहान गावाजवळील धोकादायक वळणावरून जात असताना समोरून येणाऱ्या ट्रकला चुकविताना चालकाचा स्टेअरिंगवरील ताबा सुटला. परिणामी गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल खड्ड्यात जाऊन कोसळली आणि अपघात घडला. या अपघातात इको गाडीचे मोठे नुकसान झाले असल्याची माहिती मिळाली आहे. मात्र सुदैवाने चालकाचा चमत्कारिक बचाव झाला.

## नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा भव्य सत्कार सोहळा

**किनवट : (समर्थ गांवकरी)**




एकता शारदा महिला मंडळ व एकता गणेश मंडळ, सरस्वती कॉलनी, किनवट यांच्या संयुक्त विद्यमाने नगर परिषद किनवटच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सुजाता विनोद यंड्रलवार, नवनिर्वाचित नगरसेविका निकिता स्वागत आयनेनीवर व नवनिर्वाचित नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार यांचा सत्कार आयोजित करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजया देवराव गोणेवार तर प्रमुख पाहुण्या म्हणून प्रमिला विनोद राठोड उपस्थित होत्या. युवा नेते करण येंड्रलवार तथा भाजप मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनिवार यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आले. यावेळी सत्कारमूर्ती नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांनी आपल्या बोलताना सांगितले की, येत्या पाच वर्षांच्या कालावधीत किनवट शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. शहरात भेडसावणाऱ्या पाणीटंचाई, आरोग्य व स्वच्छता, रस्ते, नाली बांधकाम, वीज आदी मूलभूत समस्यांचे कायमस्वरूपी निराकरण करून किनवट शहराचा परिपूर्ण विकास केला जाईल. शहर सुजलाम-सुफलाम करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहू, असे आश्वासन त्यांनी उपस्थित नागरिकांना दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. माधव नेम्मानिवार यांनी केले. यावेळी अशोक चनमनवार, चंद्रकांत बळवंतराव नेम्मानिवार, लक्ष्मण कनकावार, गजानन लाठकर, प्रकाश राठोड, माजी उपनगराध्यक्ष देवराव गोणेवार यांनीही आपले मनोगत व्यक्त करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रवंती विद्यासागर नेम्मानिवार यांनी केले. या प्रसंगी सरस्वती कॉलनी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा बसवेश्वरांच्या नावाने एकत्र यावे : खा. डॉ. अजित गोपछडे

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



समस्त लिंगायत समाजाने महात्मा बसवेश्वर यांच्या नावाने एकत्र आले पाहिजे, असे प्रतिपादन खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी केले. ते महात्मा बसवेश्वर विचार मंच रजिस्टर, नांदेड यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी महापौर तथा नगरसेविका शैलजा किशोर स्वामी या होत्या.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड महानगरपालिकेचे उपमहापौर भानुसिंह रावत, सिडकोचे नगरसेवक वैजनाथ देशमुख, प्रा. सचितांद बिचेवार, प्रा. बालाजी चिरडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे पुढे बोलताना म्हणाले की, लिंगायत समाजाने महात्मा बसवेश्वरांची जयंती सर्व समाज बांधवांनी एकत्र येऊन, लिंगायत समाज म्हणून एकत्रितपणे साजरी केली पाहिजे.

अध्यक्षीय भाषणात शैलजा स्वामी यांनी महात्मा बसवेश्वरांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, महात्मा बसवेश्वरांनी स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडून समाजातील लिंगभेद दूर केला आणि महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सक्षमपणे कार्य करण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या विचारांचा आदर्श समाजातील प्रत्येकाने घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रा. बिचेवार यांनी महात्मा बसवेश्वरांचे महिला विषयक विचार यावर आपले मनोगत व्यक्त केले. तर डॉ. बालाजी चिरडे यांनी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपले विचार मांडले. याप्रसंगी कार्यक्रमास उपस्थित महिलांचे महिला दिनानिमित्त खासदार डॉ. खासदार अजित गोपछडे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. पांडे मॅडम यांनी केले. प्रास्ताविक डॉ. शशिकांत तोळमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. देशमुख मॅडम यांनी मानले. याप्रसंगी लिंगायत समाजातील प्राध्यापक व प्राध्यापिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी प्रयत्न केले.

## साईबाबा संस्थान हे दुवा - यदु जोशी

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था यांच्यावतीने राबविण्यात येत असलेले उपक्रम म्हणजे येथे येणाऱ्या साईबाबा भक्तांसाठी प्रसाद आहे. भाविक आणि साईबाबा यांच्यातील दुवा म्हणून संस्थान काम करते, असे गौरवोद्गार राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी काढले. शिर्डी येथे राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीची बैठक आजपासून सुरू झाली. यावेळी समिती सदस्यांनी श्री साईबाबांचे दर्शन घेतले. त्यानंतर संस्थांनच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गोरक्ष गाडीलकर यांनी समिती अध्यक्ष आणि सदस्यांचे स्वागत केले. याप्रसंगी माहिती संचालक डॉ. गणेश मुळे, राज्य समिती सदस्य नवनाथ दिघे, प्रकाश कुलथे, नाशिक विभागीय समितीचे अध्यक्ष सुधीर लंके तसेच राज्य समितीचे सदस्य उपस्थित होते.

## नांदेड ग्रामीण पोलीस उप विभागासाठी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

अर्धापूर येथील नांदेड ग्रामीण पोलीस उपविभागासाठी शासनातर्फे मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १७६(३) अन्वये सात वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा असणाऱ्या गुन्ह्यात फॉरेन्सिक पथकाची भेट अनिवार्य करण्यात आली आहे. या अनुषंगाने येथील नांदेड ग्रामीण उपविभागासाठी एम.एच.१२ झेड. सी.९८६९ ही मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन विविध रसायने, साधनसामुग्री व कर्मचाऱ्यांच्या दोन गटांसह उपलब्ध झाली असून या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे मुख्यालय अर्धापूर येथे अहोरात्र राहील. या पोलीस उपविभागा अंतर्गत येणाऱ्या अर्धापूर, बारड, मुदखेड व लिंबगाव पोलीस स्टेशनच्या तपासिक अंमलदारांनी गुन्ह्यांच्या घटनास्थळावरील अधिक पुरावे जमा करण्यासाठी या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनच्या पथकाचा चा उपयोग घेऊन अधिकाधिक गुन्हे उघडकीस आणण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी संजीवन मिरकले यांनी केले आहे. यावेळी पोलीस उपनिरीक्षक दत्तात्र वानी, सपोउपनी चाऊस, सय्यद सलीम यांचा सह मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## मिराताई वैद्य यांचे अल्पशा आजाराने निधन

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



काय देवा काय गुन्हा केलास तू आमची देव्हाऱ्यातील माय माऊली आमच्यातून घेऊन गेला.. नेहमी प्रसन्न मुद्रा प्रत्येकाच्या सुखदुःखात धावून जाणारी एका घरची नव्हे तर संपूर्ण चितळवेढे गावातील रत्नकन्या मात्र संघर्षमय जीवन हा जीवनपट अंगीकारून आपल्या परिवाराचे नाव व आपल्या परिवाराला मिळालेले संस्कार व आरोटे परिवाराची असलेली शिदोरी मनी धरून तिने शेवटपर्यंत आजाराबरोबर संघर्ष केला मात्र जो आवडेल सर्वांना तोची आवडे देवाला त्याप्रमाणे गेल्या वीस दिवसांपासून मृत्यूशी झुंज दिली मात्र अखेर तिने या जगाचा निरोप घेतला....अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील वारकरी संप्रदायातील सुगांव येथिल कै.मिराताई भास्कर वैद्य वय 42 यांची नुकतीच मुंबई येथे उपचार घेत असताना प्राणज्योत मालवली... चितळवेढे येथील प्रगतशील शेतकरी किसन तान्हाजी आरोटे व उद्योजक नारायण तान्हाजी आरोटे यांची भगिनी होती त्यांच्या पश्चात पती मुले सासु दिर मुले भाऊ आई वडील असा परिवार होता त्यांच्या अंत्यविधी समयी राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यांच्या निधनाने पंचक्रोशीत हळहळ व्यक्त केली जात आहे त्यांच्यावर प्रवरा तिरावरील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# पुण्यात सितारा आयकॉन राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा उत्साहात

**समाजसेवक नानजीभाई ठक्कर यांच्यासह १२० मान्यवरांचा सन्मान!**

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



जागतिक महिला दिनानिमित्त पुणे येथील बालकृष्णा बँक्वेट हॉल येथे सितारा महिला विकास संस्था आयोजित सितारा आयकॉन राज्यस्तरीय पुरस्कार व संस्थेच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात समाजसेवक डॉ. नानजीभाई ठक्कर यांच्यासह सुमारे १२० मान्यवरांचा शाल, पगडी व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई, ज्येष्ठ अभिनेत्री अर्चना नेवरेकर, सुप्रसिद्ध गायक संतोष चौधरी उर्फ दादुस, समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, समाजकल्याण आयुक्त विशाल लोंढे, पुणे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, अभिनेत्री वैशाली जाधव तसेच राजयोगी दत्ताजी शिंदे महाराज प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या भव्य कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सौ. आयेशा सादिक तांबोळी, अध्यक्षा – सितारा महिला विकास संस्था, सितारा महिला बचत गट महासंघ आणि सितारा महिला गृहउद्योग यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी व समाजाच्या प्रगतीसाठी त्या करत असलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे मान्यवरांनी यावेळी नमूद केले. या सोहळ्यात समाजसेवक नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या समाजोपयोगी कार्याचाही गौरव करण्यात आला. समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी त्यांनी केलेली सेवा आदर्शवत असल्याचे वक्त्यांनी सांगितले. तसेच प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई, भूमाता ब्रिगेड व भूमाता फाउंडेशनच्या संस्थापक तसेच बिग बॉस फेम व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देसाई यांनी महिलांच्या हक्कांसाठी, समानतेसाठी आणि सामाजिक न्यायासाठी केलेले कार्य संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे यावेळी गौरवण्यात आले. यावेळी बोलताना समाजसेवक नानजीभाई ठक्कर म्हणाले की, "आपण दरवर्षी महिला दिन साजरा करतो; परंतु खऱ्या अर्थाने महिलांना न्याय मिळवून द्यायचा असेल तर प्रत्येक दिवस हा महिला दिन म्हणून साजरा केला पाहिजे." ते पुढे म्हणाले की, केवळ ८ मार्च रोजी महिलांचा सन्मान करून नंतर त्यांना विसरणे योग्य नाही. समाज आणि देशाची प्रगती व्हायची असेल तर महिलांकडे सन्मानाने आणि समानतेने पाहणे आवश्यक आहे. घरातील स्त्री हीच घराची श्रीलक्ष्मी असून तिचा आदर करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. तसेच आई-वडिलांचा सुद्धा सन्मान राखून कुटुंबात प्रेम, आदर आणि आपुलकी टिकवणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. सितारा आयकॉन राज्यस्तरीय पुरस्कार हा केवळ सन्मान नसून समाजात सकारात्मक बदल घडवणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेण्याचा एक सुंदर प्रयत्न असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. अशा सन्मानामुळे समाजसेवेत कार्यरत असलेल्या अनेकांना प्रेरणा मिळते आणि समाजसेवेची नवी ऊर्जा निर्माण होते.

# महिला दिनी लोहा शहरात स्वच्छता मोहीम

## स्वच्छता कर्मचाऱ्यांचा साडी-चोळी देऊन गौरव



**लोहा : (समर्थ गांवकरी)**

जागतिक महिला दिनानिमित्त लोहा नगरपालिकेच्या वतीने शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या मोहिमेत शहरातील माता-भगिनींनी पुढाकार घेत रस्त्यावर उतरून स्वच्छतेचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सामूहिक सहभाग किती आवश्यक आहे, याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.या स्वच्छता अभियानासाठी लोकनियुक्त नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी पुढाकार घेतला. यावेळी उपनगराध्यक्ष करीम शेख, गटनेते भास्कर पवार, नगरसेवक केशवराव मुकदम, हरिभाऊ चव्हाण, केतन खिल्लारे, राजेश बोडके, तुकाराम दाढेल, सदानंद तेलंग, मारुती जंगले, पंकज परिहार, अविनाश पवार, गणेश बगाडे, नारायण येलरवाड यांच्यासह नगरसेवक-नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच माजी नगरसेविका शोभाताई बगडे, मराठा सेवा संघाच्या तालुका अध्यक्षा वर्षाताई जामगे, डॉ. सविताताई घंटे, सविताताई सातेगावे, प्रकल्प अधिकारी मंजुषा जाधव, स्वच्छता निरीक्षक लता ढवळे, डोंगरे ताई, प्रा. डॉ. डी. एम. पवार, व्यापारी तुकाराम कोटलवार, विजय कोटलवार, प्रा. संजय मक्तेदार, गंगाधर मामा महाबळे यांच्यासह ज्येष्ठ नागरिक, महिला, व्यापारी व पत्रकार आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग नोंदवला आहे. स्वच्छता मोहिमेनंतर जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख व नगरसेवकांच्या हस्ते महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला.लोहा नगरपालिकेच्या स्थापनेपासून प्रथमच जागतिक महिला दिनानिमित्त महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आल्याने महिलांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



ठाणे : दिव्यात श्रीमंतयोगी प्रतिष्ठान आयोजित १० वा शिवजयंती उत्सव गणेश तलाव येथे साजरा करण्यात आला. श्री शिव छत्रपती महाराजांच्या मुर्तीची मिरवणूक, मुर्ती प्रतिष्ठापना, श्री सत्यनारायणाची महापुजा, महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ, शिव भंडारा, सुस्वर भजन व रात्री नमन आयोजित करण्यात आले होते. प्रसंगी अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शविली तर मंडळाचे आधारस्तंभ शशिकांत पाटील यांच्यासह मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी शिवउत्सवात खूप मेहनत घेतली. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### बिलोली खरेदी-विक्री संघ निवडणुकीत खतगावकर गटाचे यश

बिलोली (स. गांवकरी) : बिलोली तालुका शेतकरी खरेदी-विक्री संघ संस्था मतदार संघात अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते माजी मंत्री तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या गटाने आपले वर्चस्व सिद्ध करत शानदार विजय संपादन केला आहे. दुसरीकडे, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड यांच्या नेतृत्वाखालील गटाला या निवडणुकीत पराभवाचा धक्का सहन करावा लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रणीत श्री संगमेश्वर शेतकरी विकास पॅनलचे अधिकृत उमेदवार पाटील बालासाहेब रामराव व मंगनाळे रमेश मोगलप्पा हे विजयी झाले आहे. बिलोली शहरातील नवीन स्थानक येथे फटाक्याची आतिषबाजी करुन जल्लोष साजरा केला यावेळी माजी नगराध्यक्ष यादराव तुडमे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवी पाटील खतगावकर, राष्ट्रवादी चे श्रिनिवास पाटील नरवाडे,उप सभापती आनंद बिराजदार, अभिजित तुडमे ,गोविंदराव बादेवार, इंद्रजित तुडमे, सय्यद रियाज,शंकरराव हांडे ,श्रीराम पाटील , संतोष पुय्यड,गंगाधर नरवाडे,हणमंतराव बिराजदार ,मारुतीराव पाटील, मिलिंद मांजरमकर, दिलीप उत्तरवाड,मारोती पाटील दगडे, राजु गादगे,मारोती नाईक,बाजीराव पाटील , गणेश मेडेकर, सोमदास गजलवाड, दिपक शिंदे, यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये ‘कॉम्प्रिहेन्सिव्ह कॅन्सर अँड बर्न सर्व्हिसेस’चा शुभारंभ



भोसरी (स. गांवकरी) : पिंपरी-चिंचवड परिसरातील रुग्णांसाठी अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांचा आणखी एक टप्पा गाठत मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरी येथे कॉम्प्रिहेन्सिव्ह कॅन्सर अँड बर्न सर्व्हिसेस विभागाचा शुभारंभ नुकताच पार पडला. या नव्या विभागामुळे कॅन्सर तसेच भाजलेल्या रुग्णांना एकाच छताखाली आधुनिक आणि सर्वसमावेशक उपचार सुविधा उपलब्ध होणार आहेत. इंद्रायणी नगर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आयोजित कार्यक्रमाला संजिवन सांगळे तसेच पद्मश्री पुरस्कार विजेते सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते या नव्या सेवांचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना मान्यवरांनी कॅन्सरसारख्या गंभीर आजारांवर वेळेत निदान आणि आधुनिक उपचार उपलब्ध होणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले. मेडिकव्हर हॉस्पिटलने सुरू केलेल्या या नव्या विभागामुळे पिंपरी-चिंचवड आणि भोसरी परिसरातील रुग्णांना अत्याधुनिक उपचारांची सुविधा जवळच मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले. मेडिकव्हर हॉस्पिटल हे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीने कॅन्सरचे निदान, केमोथेरपी, शस्त्रक्रिया तसेच विविध प्रकारचे उपचार उपलब्ध करून देणाऱ्या अग्रगण्य रुग्णालयांपैकी एक मानले जाते. येथे आधुनिक निदान साधने, तज्ज्ञ ऑन्कोलॉजिस्ट आणि रुग्णकेंद्रित उपचार पद्धती उपलब्ध आहेत. या नव्या सेवेमुळे कॅन्सर तसेच भाजलेल्या रुग्णांसाठी आपत्कालीन सेवा, अत्याधुनिक उपकरणे आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली उपचार मिळणार असल्याचे हॉस्पिटल प्रशासनाने सांगितले. मेडिक्व्हर हॉस्पिटल ही आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेली आरोग्यसेवा संस्था असून युरोप आणि भारतातील अनेक देशांमध्ये तिचे रुग्णालयांचे जाळे आहे. कार्यक्रमाला डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या विभागामुळे परिसरातील रुग्णांना उपचारासाठी दूरवर जाण्याची गरज कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.




ठाणे : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मा. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला संघटिका सविता शिंदे आणि शाखाप्रमुख सुनील कांबळे यांचे आयोजनातून शिवसेना शाखा एन. आर. नगर येथे भव्य नेत्र चिकित्सा शिबीर, आधारकार्ड शिबीर, मोफत शिवण क्लासच्या महिलांना प्रमाणपत्र वाटप करून महिलांचा सन्मान करण्यात आला. ( फोटो - संतोष पडवळ )

# जागतिक महिला दिनानिमित्त लसीकरण मोहिमेचे उत्साहात उद्घाटन

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नांदेड जिल्ह्यामध्ये गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करणाऱ्या 'एचपीव्ही' (HPV) लसीकरण मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ प्राथमिक आरोग्य केंद्र, मुगट (ता. मुदखेड) येथे अत्यंत उत्साहात करण्यात आला. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम संपूर्ण जिल्ह्यात नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात येत आहे.

या विशेष मोहिमेचे उद्घाटन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी १४ ते १५ वयोगटातील किशोरवयीन मुलींना लस देऊन मोहिमेचा प्रत्यक्ष प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाला गावातील नागरिक, महिला, विद्यार्थिनी, आरोग्य कर्मचारी आणि विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गैरसमज दूर करण्याचे आवाहन**

उद्घाटनानंतर मार्गदर्शन करताना डॉ. संगीता देशमुख यांनी महिला व पालकांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की:

"HPV लस ही पूर्णपणे सुरक्षित असून मुलींचे भविष्य सशक्त बनवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी कोणत्याही अफवा, अंधश्रद्धा किंवा गैरसमजांना बळी पडू नये. आपल्या मुलींच्या सुरक्षित आरोग्यासाठी ही लस घेण्यास पुढे यावे." जिल्ह्यातील एकूण २७ हजार मुलींना ही लस देण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाने ठेवले आहे.

वयोगट: १४ ते १५ वर्ष वयोगटातील मुलींचे लसीकरण करण्यात येत आहे.

नियोजन: जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली ही मोहीम गावपातळीवर राबवली जात आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुगट येथील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा सेविका आणि अंगणवाडी सेविकांनी विशेष परिश्रम घेतले. महिला दिनाचे औचित्य साधून उपस्थित महिला व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या मोहिमेमुळे जिल्ह्यातील हजारो मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळणार असून, आरोग्य विभागातर्फे हे एक मोठे पाऊल उचलण्यात आले आहे.

# गुढीपाडव्याच्या संगीत आखाडी यात्रेचा लिलाव विक्रमी

**लिंगदेव : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील लिंगदेव येथे गुढीपाडव्याच्या निमित्ताने होणाऱ्या पारंपरिक संगीत आखाडी यात्रेच्या लिलावाने यंदा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. तब्बल १६ लाखांहून अधिक रकमेवर बोली लागल्याने या यात्रेची परंपरा व गावकऱ्यांचा उत्साह पुन्हा एकदा अधोरेखित झाला. धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा हा उत्सव दरवर्षी भगवान लिंगेश्वर मंदिर, लिंगदेव येथे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गुढीपाडव्याच्या दिवशी पार पडणाऱ्या या पारंपरिक आखाडीत गावातील ग्रामस्थ रामायण व महाभारतातील विविध पात्रांची सोंगे घेऊन नृत्य सादर करतात. या सोंगांच्या मानासाठी दरवर्षी लिलाव घेतला जातो. या लिलावाचे वैशिष्ट्य म्हणजे गावातील भूमिपुत्रांनाच सोंगांचा मान घेण्याची संधी दिली जाते, त्यामुळे परंपरेचे जतन होत आहे. भगवान लिंगेश्वर सभामंडपात झालेल्या या लिलावाचे माईकद्वारे पुकार करण्यात आले. तसेच “आवाज सह्याद्रीचा” लाईव्ह चॅनलद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात आल्याने देश-विदेशात नोकरी, व्यवसाय व सैन्य सेवेत असलेल्या गावातील भूमिपुत्रांनाही लिलावात सहभागी होता आले. त्यामुळे यंदाचा लिलाव दरवर्षीपेक्षा अधिक रकमेवर जाऊन विक्रमी ठरला.





# कृष्णदेवाच्या काठीचा विधिवत समारोप

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

- चार गावातून सुरुवात, तिस गावात मुक्काम

ग्रामीण भागात कृष्णदेवाची म्हणून काठी म्हणून पारंपरिक ओळख असलेल्या धार्मिक सोहळ्याचा फाल्गुन महिन्यातील दशमीला दहाव्या दिवशी चार गावांमध्ये विधिवत समारोप झाला. वायफना बुद्रुक,पिंपराळा, पांगरी, तळेगाव या गावातील कृष्ण मंदिरात फाल्गुन एकादशीला काठीचे पूजन करून गावातून प्रस्थान झाले होते. अंदाजे १५ फूट लांब काठीला विविध वस्त्र बांधून सजवून काठीचे मानकरी व सहभागी भाविक दहा दिवस अनवाणी राहून अंदाजे आठ ते दहा गावात मुक्कामी जातात. मुक्कामी असलेल्या गावात काठीचे पारंपरिक पद्धतीने स्वागत होते. काठी वाहून नेताना पारंपारिक डफ व पुंगी वाद्याचा गजर वातावरण खुलविते. दहा दिवसात अंदाजे ८० किलोमीटर पायी प्रवास होतो. दशमीला मूळ गावी काठीची आगमन होऊन पंचक्रोशीतील हजारो ग्रामस्थांच्या उपस्थितीत लग्न सोहळा रंगतो. यावेळी कृष्ण मंदिराभोवती काठीला पाच प्रदक्षिणा घालून मंगलाष्टकाद्वारे लग्न सोहळा रंगतो. पारंपरिकता ग्रामीण भागातील पारंपारिकता जपणारा हा काठीचे लग्न सोहळा सोहळ्यामध्ये कुठलाही वाद्य वाजविले जात नाही. वायफना बुद्रुक, पिंपराळा, तळेगाव, पांगरी येथील काठीचे लग्न सोहळ्यात पारंपारिकता व ग्रामीण संस्कृतीचे दर्शन बघायला मिळाल्याचा आनंद अनुभवायला येतो.

# ‘स्वारातीम’ विद्यापीठाचा संघ राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी चेन्नईला रवाना



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

भारतीय विद्यापीठ महासंघ (AIU) यांच्या वतीने आयोजित ३९ व्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवक महोत्सवात (UNIFEST) सहभागी होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा संघ चेन्नईकडे रवाना झाला आहे. हा महोत्सव १० ते १४ मार्च, २०२६ दरम्यान तमिळनाडूतील चेन्नई येथील सत्यभामा इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी येथे होणार आहे. या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय महोत्सवात विद्यापीठाचा संघ सहा विविध कलाप्रकारांमध्ये आपले कौशल्य सादर करणार आहे. यात शास्त्रीय सूरवाद्य, फोक आर्केस्ट्रा, आदिवासी दंडार नृत्य, संकल्पना नृत्य, प्रहसन (Skit) आणि मूकअभिनय (Mime) या स्पर्धांचा समावेश आहे. या माध्यमातून मराठवाड्याची कला राष्ट्रीय स्तरावर सादर होणार आहे.

संघ रवाना होण्यापूर्वी विद्यापीठ संकुलात विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रेरणा दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, प्र.कुलसचिव डॉ. डी.डी. पवार, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे आणि परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. हुशारसिंह साबळे यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, ‘रासेयो’ संचालक डॉ. मारोती गायकवाड आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी संघाला शुभेच्छा देत प्रोत्साहन दिले. विद्यार्थी विकास विभाग आणि विद्यापीठ प्रशासनाने संघासाठी आवश्यक सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या असून, राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाचा झेंडा फडकवण्यासाठी विद्यार्थी सज्ज झाले आहेत. या संघात विद्यार्थी-विद्यार्थिनींसह अनुभवी मार्गदर्शक व प्रशिक्षकांचा समावेश आहे. संघ व्यवस्थापक डॉ. संदीप काळे काम पाहत आहेत. त्यांच्या सोबत डॉ. शिवराज शिंदे, दिलीप डोंबे, सिद्धार्थ नागठाणकर, संदेश हटकर, संकेत गाडेकर तसेच वाद्यवृंद साथीदार चेन्नईकडे रवाना झाले आहेत.

# कुंटूर परिसरातील ‘उमेद ’भरारी महिलांना देते बळ

- "लखपती दीदी "झाल्या महिला सक्षमीकरणास महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची साथ

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**



नायगाव तालुक्यातील कुंटूर जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येणाऱ्या नारीशक्ती महिला प्रभाग संघाचे कार्य एक पाऊल आर्थिक उन्नती कडे दिसून येत आहे . यामध्ये नारीशक्ती महिला प्रभाग संघ कुंटूर अंतर्गत एकूण 23 गावांमध्ये शंभरच्या वर महिला बचत गट स्थापन करण्यात आले आहे. त्या महिला बचत गटा अंतर्गत गावागावात ग्रामसंघ तयार करून महिला बचत गटांना बळ व त्यांना आर्थिक उलाढालेसाठी बँकेची साथ त्यातच पंचायत समिती अंतर्गत उमेद अभियानाची हात दिल्यानंतर महिलांनी आपल्या उद्योग व्यवसायाला सुरुवात केली. कुंटूर येथे आज 74 महिला बचत गट स्थापना असून प्रत्येक महिला बचत गटाला दहा लाखाचे कर्ज बँकेमार्फत उपलब्ध करून दिल्यानंतर महिलांनी आपापल्या व्यवसाय उद्योगाला सुरुवात करून एक पाऊल सक्षमीकरणाकडे नेत आहेत .त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे कुंटूर ची घोंगडी हे महाराष्ट्रात नंबर एक ला आली असून दूध व्यवसाय शेळीपालन महिला सक्षमीकरणासाठी पर्यायी मार्ग ठरला आहे. महिला बचत गट स्थापन करून महिलांना सक्षमीकरणाचे धडे देत महिलांना स्वावलंबी बनवणे व त्या महिलांच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग सुकर करण्याचे सात हे प्रमुख महिला समूह संसाधन व्यक्ती यांच्या कार्याचे प्रतिक मानले जाते. गावागावात महिला सक्षमीकरण करण्यासाठी ग्राम सखी यांची कार्य मोलाची असून परिसरात सौ. रेखाताई अनिल कांबळे यांनी कुंटूर येथील 74 महिला बचत गटांना सक्षमीकरणाकडे वाटचाल करण्यास सहकार्य केले हे उत्कृष्ट कार्य जागतिक महिला दिनानिमित्त परिचितअसावे आहे.

ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरण (Rural Women Empowerment) म्हणजे ग्रामीण महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे. यामध्ये महिलांना निर्णय प्रक्रियेत सामील करून घेणे आणि त्यांना समान हक्क मिळवून देणे समाविष्ट आहे. ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी खालील प्रमुख बाबी महत्त्वाच्या आहेत:

ग्रामीण महिला सक्षमीकरणाचे प्रमुख पैलू:

आर्थिक स्वावलंबन: ग्रामीण भागातील महिलांना उद्योजिका बनवण्यासाठी स्वयंसहाय्य गट (SHG - Self Help Groups) महत्त्वाची भूमिका बजावतात. या गटांद्वारे महिलांना छोटे उद्योग (उदा. पापड, लोणचे, शिलाई, हस्तकला) सुरू करण्यासाठी कर्ज आणि प्रशिक्षण मिळते.

शिक्षण आणि कौशल्य विकास: महिलांचे साक्षरता प्रमाण वाढवणे आणि त्यांना तंत्रज्ञान, डिजिटल साक्षरता व शेतीपूरक व्यवसायांचे प्रशिक्षण देणे, ज्यामुळे त्या रोजगाराच्या संधी शोधू शकतील.

राजकीय सहभाग (ग्राम पंचायत): महिलांना 'महिला सभे'द्वारे ग्रामसभेत आपल्या गरजा मांडण्याची आणि ग्राम विकासात निर्णय घेण्याची संधी मिळते. 'महिला-अनुकूल ग्रामपंचायत' उपक्रम महिलांचे नेतृत्व वाढवण्यास मदत करतात.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# गंगापुरात 'आसाळ्या' उत्सवाचा जल्लोष

## हऱ्या साबळेंच्या संबळाने घुमला आसमंत!



**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

कळवण तालुक्यातील गंगापूर येथे होळी सणानिमित्ताने पूर्वजांची परंपरा असलेल्या आसाळ्या कार्यक्रम येथील गावकरी आजही अगदी पूर्वजांच्या पावलावर पाऊल ठेवून हा कार्यक्रम करत आहे गुरुवारी रात्री 7 वाजेपासून तर सकाळी 6 वाजेपर्यंत हा कार्यक्रम चालू असतो ही अनोखी परंपरा तालुक्यात बहुतेक किरकोळ खेडेगावात चालू आहे मात्र गंगापूर गावकऱ्यांनी ही परंपरा आज देखील टिकून ठेवली आहे या कार्यक्रमात सर्वात महत्वाचे म्हणजे पूर्वजांनी जिवंत कलेला महत्व दिले होते मानवी जीवनात ग्रामीण भागात जसे घडते त्याचे ज्वलंत उदाहरण आसाळ्या कार्यक्रमात दाखविले जाते. गंगापूरात आदिवासी संस्कृतीचा जागर अगदी उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक 'आसाळ्या' उत्सवानिमित्त भव्य रथ मिरवणूक आणि गंगापूर येथील रंगतदार तमाशाचे आयोजन करण्यात आले होते. रात्री ७ वाजल्यापासून सुरू झालेला हा कार्यक्रम पहाटे ६ वाजेपर्यंत पारंपरिक पद्धतीने पार पडला. या उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले गंगापूरचे नावाजलेले तमाशा मंडळ. मनोरंजनासोबतच आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणारी विविध लोककला सोंगे यावेळी सादर करण्यात आली. कॉमेडी सोंगे,भामर्या गोऱ्हा सोंग, तसेच गवळी-गवळण भगत , दही-लोणी आणि आसाळ्या यांसारख्या पारंपरिक लोककलेच्या सोंगानी उपस्थितांची मने जिंकली. पूर्वजांनी सुरू केलेली 'आसाळ्या' ही परंपरा आजही येथील ग्रामस्थ अत्यंत श्रद्धेने आणि उत्साहाने जपताना दिसत आहेत.या सोहळ्याची खरी रंगत वाढवली ती जामशेत येथील प्रसिद्ध हऱ्या साबळे आणि त्यांच्या संबळ ताफ्याने. त्यांच्या संबळाच्या कडकडाटाने अवघे गंगापूर दुमदुमून गेले. सदर कार्यक्रमासाठी गंगापूर येथील जेष्ठ नागरिक भावराव बहिरम,किसन देशमुख, भिवा बहिरम,वसंत बहिरम,यशवंत बहिरम,नारायण गावित,एकनाथ थैल, यांच्या मार्गदर्शनाखाली तरुण युवा मंडळी प्रत्येक कार्यक्रमात हिरीरीने सहभागी होत पूर्वजांच्या प्रत्येक परंपरा आजही कायम जोपासत आहेत. सदर आसाळ्या कार्यक्रम पाहण्यासाठी पंचक्रोशीतील परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेट्टीवारसह अनेकांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



बिलोली नागरीचे माजी उपनगराध्यक्ष आनंद गुडमलवार व माजी नगरसेवक लक्ष्मण शेट्टीवार यांच्यासह अनेकांनी मागील आठवड्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुंबई येथील निवास्थानी शिंदे यांच्या शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे. याबद्दल दि. ७ मार्च रोजी बिलोली शासकीय विश्रामगृह येथे नांदेड उपजिल्हाप्रमुख व्यंकटराव पाटील खतगांवकर यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद व पक्ष प्रवेशाचा स्वागत सोहळा पारपडला आहे.

गेल्या काही वर्षापासून तालुका व बिलोली शहर स्तरावर माजी नगरसेवक लक्ष्मण शेट्टीवार व माजी उपनगराध्यक्ष आनंद गुडमुलवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची खंबीरपणे धुरा सांभाळून पक्षाला शहरात बळकट केले होते. पण परवा झालेल्या नगर परिषद निवडणूकित राष्ट्रवादीला सोडून कांग्रेस पक्षासाठी काही दिवस कार्य बजावले होते. परंतु देशातील कॉग्रेस पक्षाची गळती कळा पाहून, शहराच्या व तालुक्याच्या हितासाठी मागील आठवड्यात शेट्टीवार व गुडमुलवारसह, देवन्ना तोंदरोड, चक्रधर पाटील टेकाळे यांनी मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिवसेनेत प्रवेश केला. त्याचाच एक भाग म्हणून शिवसेनेचे नांदेड उपजिल्हाप्रमुख यांच्या उपस्थित दि. ७ मार्च रोजी बिलोली येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद व पक्षप्रवेश सोहळा आयोजित केला यावेळी उपजिल्हाप्रमुख व्यंकटराव पाटील खतगावकर, तालुकाप्रमुख बाबाराव रोकडे यांच्या उपस्थितीत संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष चक्रधर पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष साईनाथ हंगरगे, अजनीचे इरेश

मुंडकर, अर्जापूरचे सायलू शेट्टीवार यांचा यावेळी पक्षप्रवेश करून घेतला. यादरम्यान खतगावकर यांनी पक्षात सर्वांना योग्य सन्मान दिला जाईल असे आश्वासन दिले आहे. यासमयी शेट्टीवार यांनी ही आपल्या भावना व्यक्त केल्या. बिलोली शहरात आगामी काळात शिवसेनेला सर्वांनी मिळून मजबूत करण्याचा निश्चिय केला आहे.यावेळी अनेक कार्यकर्ते व पत्रकारांची उपस्थिती होती.

# दिव्यांगांसाठी मोफत सहाय्यक साधन तपासणी शिबिर

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




दिव्यांग व्यक्तीच्या चेहऱ्यावर निर्माण होणारा आनंद अत्यंत महत्त्वाचा असून तो निर्माण करण्याचे काम विखे पाटील फाउंडेशन करत आहे. हे कार्य खरोखरच अतुलनीय आहे, असे मत अगस्ती साखर कारखान्याच्या व्हा. चेअरमन सुनीताताई भांगरे यांनी व्यक्त केले. अकोले येथील अगस्ती विद्यालयात आयोजित दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत सहाय्यक साधन तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी अकोले एज्युकेशन संस्थेचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, अगस्ती शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष सतीश नाईकवाडी, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, माजी नगराध्यक्ष सोनाली नाईकवाडी, अमृतसागर दूध संघाचे व्हा. चेअरमन रावसाहेब वाकचौरे, उपनगराध्यक्ष शरद नवले, अकोले एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, भाजपा महिला आघाडी जिल्हा सरचिटणीस रेश्मा गोडसे, दूध संघाचे संचालक आनंदराव वाकचौरे, खंडू वाकचौरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सोनाली नाईकवाडी यांनी सांगितले की, अकोले तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागातील प्रत्येक दिव्यांग व्यक्तीपर्यंत आवश्यक सहाय्यक उपकरणे पोहोचवून त्यांचे जीवन सुलभ करण्याचे काम ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकारातून करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक विकास वाकचौरे (विखे पाटील फाउंडेशन) यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कोकणे यांनी केले तर आभार भाऊसाहेब वाकचौरे (भाजपा सोशल मीडिया सेल उत्तर नगर जिल्हा संयोजक) यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील गमे, संतोष कोकणे, दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे अनाप, राजाराम वाकचौरे, भाजयुमो जिल्हा सचिव सुशांत वाकचौरे, दिव्यांग सेलचे बाळासाहेब धुमाळ, संतोष वाकचौरे यांनी विशेष सहकार्य केले.

# 'महाराजस्व अभियान शिबिर' उत्साहात संपन्न

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

राहाता तालुक्यातील बाभळेश्वर मंडळात महसूल प्रशासन व विविध विभागांच्या संयुक्त विद्यमाने 'महाराजस्व अभियान' तसेच 'छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबीर (टप्पा क्र. १)' उत्साहात पार पडले. या शिबिराच्या माध्यमातून परिसरातील शेकडो नागरिकांना एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा व दाखल्यांचे थेट वाटप करण्यात आले. हे शिबिर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.यावेळी प्रशासनाच्या वतीने अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, शिर्डीचे प्रांताधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, गटविकास अधिकारी विवेक गुंड, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, भूमी अभिलेख अधीक्षक योगेश थोरात आदी अधिकारी उपस्थित होते.

# कुमशेत शाळेत 'खाऊ गल्ली' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**




जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुमशेत येथे "दप्तरमुक्त आनंददायी "खाऊ गल्ली" हा नवोपक्रम उत्साहात राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारून छोटेखानी बाजारपेठच उभी केली. या उपक्रमामुळे शाळेच्या परिसरात आनंदी आणि उत्साही वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित महिलांच्या हस्ते सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले .

अथर्व डोके - बॉबी व गोळ्यांचे दुकान, शिवांश डोके - कोकम ज्यूस, साई डोके - भजी-पाव, ईश्वरी व ज्ञानेश्वरी शेलार - ओळी भेळ, वेदश्री डोके - खमंग ढोकळा, आली इमामदार - भेळ , स्वरा डोके - सँडविच, रिया दुधाळ - खाऊ, आरोही भगत - ढोकळा, विराज डोके - वेफर्स व पाणी बॉटल, कृष्णा डोके - वडापाव सेंटर, पर्णवी डोके - ज्यूस सेंटर, विराज वाणी - इडली सेंटर, समर्थ वाणी - ज्यूस सेंटर, ओवी डोके - मसाला पापड, मानसी वाणी - समोसा, रुद्र डोके - चाट कॉर्नर, आरुष डोके - कोकम सरबत, तनुज डोके - पॉपकॉर्न, देवांश डोके - पाणीपुरी, शंतनू डोके - वडापाव व चहा, तर प्रसाद डोके - ओली भेळ असे अनेक आकर्षक स्टॉल विद्यार्थ्यांनी उभारले.

विद्यार्थ्यांनी स्वतः पदार्थ विक्री करून सुमारे सात हजार रुपयांची कमाई केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान, पैशाचे नियोजन, ग्राहकांशी संवाद आणि स्वावलंबनाचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून शिकता आले. विद्यार्थ्यांच्या पदार्थ तयारीत पालक—विशेषतः आई-वडिलांचा मोलाचा वाटा होता. या प्रसंगी सरपंच रवींद्र डोके ,अध्यक्ष आशितोष डोके, उपाध्यक्ष शिवकन्या वाणी, ग्रामपंचायत सदस्य राजेश डोके, माजी अध्यक्ष सत्यवान डोके, माजी संचालक शिवाजी डोके, यांच्यासह गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते. सुत्रसंचालन उपशिक्षक श्याम लोलापोड व आभार मुख्याध्यापक यश घोडे यांनी केले .

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरात शिवजयंती व वर्धापन दिन सोहळा उत्साहात

## मंदिराच्या विकासासाठी निधी मिळवण्यासाठी प्रयत्न करणार – मंत्री शिवेंद्रराजे भोसले



**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील मराडेपाडा येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरात तिथीनुसार शिवजयंती तसेच मंदिराचा वर्धापन दिन सोहळा धार्मिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती तसेच फुलांच्या सजावटीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला होता. वर्धापन दिनानिमित्त मंदिरात भजन, कीर्तन, शिवचरित्र कथन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर ६ मार्च रोजी पंचक्रोशीतील शिवभक्तांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. या सोहळ्याला मोठ्या संख्येने भाविक आणि शिवभक्त उपस्थित होते. सायंकाळी या कार्यक्रमाला राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज शिवेंद्रराजे भोसले यांनी उपस्थित राहून महाराजांचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी 'शिवक्रांती प्रतिष्ठान'चे संस्थापक राजुभाऊ चौधरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उभा केलेल्या या भव्य उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाला आमदार किसन कथोरे हेही विशेष उपस्थित होते. यावेळी बोलताना शिवेंद्रराजे भोसले यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर आंध्र प्रदेशातील श्रीशैलम येथे आहे; मात्र मराठी युवकांनी एकत्र येऊन स्वतःच्या जिद्दीवर मराडेपाडा येथे उभारलेले हे भव्य मंदिर अत्यंत कौतुकास्पद आहे. मी स्वतः या घराण्याचा वंशज असूनही येथे येऊन भारावून गेलो असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.या प्रसंगी 'शिवक्रांती प्रतिष्ठान'चे संस्थापक राजुभाऊ चौधरी आणि प्रमुख मार्गदर्शक हभप कैलास महाराज निचिते यांनी मान्यवरांचे स्वागत केले. मंदिराच्या विकासासाठी आणि पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, तसेच या ठिकाणामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील, असे आश्वासन शिवेंद्रराजे भोसले यांनी दिले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंध्र प्रदेशातील श्रीशैलम येथील मंदिरानंतर भिवंडी तालुक्यातील मराडेपाडा येथील मंदिराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मराठी माणूस मनात आणल्यास तो कोणतेही मोठे कार्य करू शकतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे या मंदिराची उभारणी असल्याचेही त्यांनी नमूद केले. शासनाने आमदार किसन कथोरे यांच्या माध्यमातून या मंदिराला 'ब' वर्ग पर्यटन दर्जा दिल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

# विविध गुणदर्शन कार्यक्रम संपन्न

**वैजापूर : (समर्थ गांवकरी)**

वैजापुर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मीवाडी - या शाळेत विवीध गुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला. शालेय समितीचे अध्यक्ष कैलास पाटील आहेर यांच्या संकल्पनेतून विवीध गुणदर्शनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शालेय समिती सदस्य या सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम - देवा श्री गणेशा या गीतांनी कार्यक्रमाची सुरुवात झाल्यानंतर एकच राजा इथे जन्मला, वेसावची पारु नेसली गो, पाटलांचा बैलगाडा, ढोलकीच्या तालावर, अंगात आलाय देव पुढे आकरा रुपये ठेव, वासुदेव आला हो वासुदेव आला, मै तो कोल्हापुर से आई हूँ, नभात आभाळ दाटल या गं, गुलाबी साडी आणि लाली पाहिजे, नको मला बंगला नको गाडी पाहिजे, तुला बघून काळीज माझं करतय, झापुक झुपुक यासह विवीध गाणे वैयक्तीक आणि ग्रुप डान्स विद्यार्थ्यांनी सादर केले.

# पुणे जिल्हा परिषदेमध्ये इंदापूर तालुक्याला श्रीमंत ढोले यांच्या रूपाने गटनेतेपदाचा मिळाला बहुमान

■ इंदापुरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

**इंदापूर : (समर्थ गांवकरी)**



पुणे जिल्हा परिषदेच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी इंदापूर तालुक्यातील काटी जिल्हा परिषद गटातून निवडून आलेले जिल्हा परिषद सदस्य श्रीमंत ढोले यांची निवड करण्यात आली .उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बंद पाकीटातून श्रीमंत ढोले यांच्या नावाची शिफारस केली .आमदार सुनील शेळके यांनी नवनिर्वाचित सदस्यांच्या बैठकीत हे बंद पाकीट उघडले आणि गटनेते पदी श्रीमंत ढोले यांची निवड करण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले. या निवडीमुळे इंदापूर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले श्रीमंत ढोले यांच्या गटनेता या निवडीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा परिषदेच्या सर्व सदस्यांनी पाठिंबा दर्शवला आहे. त्यानंतर गटस्थापनेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांवर सर्व सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. गटनेतेपदी निवड झाल्यानंतर श्रीमंत डोले यांनी पक्षश्रेष्ठीसह सर्वांचे आभार मानले.

शुक्रवारी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आणि जिल्हा परिषद निवडणुकीचे जिल्हा समन्वयक सुरेश घुले यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे जिल्हा परिषदेतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित सदस्यांची बैठक पार पडली. यावेळी आमदार सुनील शेळके, माजी आमदार रमेश थोरात, माजी आमदार अशोक पवार, माजी आमदार संभाजी कुंजीर, जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजय कोलते, देवराम लांडे, पक्षाचे जिल्हाध्यक्ष संभाजी होळकर, राजेंद्र कोरेकर, विठ्ठल शिंदे ,जिल्हा परिषदेतील माजी गटनेते शरद बुट्टे पाटील इत्यादी उपस्थित होते.

# गुजरात जामनगर केंद्रात ५० बिबटे स्थलांतरास परवानगी

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

माणिकडोह बिबट निवारा केंद्राची क्षमता ५० एवढी असल्याने अतिरिक्त बिबट्याचे भारतातील इतर संरक्षित ठिकाणी स्थलांतर करणे आवश्यक होते . ५० बिबट्यांना गुजरात राज्यातील जामनगर ग्रीन्स झुलॉजिकल रेस्क्यू ॲण्ड रिहॅबिलिटेशन सेंटर वनतारा येथे स्थलांतर करण्याबाबतच्या प्रस्तावास केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण नवी दिल्ली यांनी या प्रस्तावास २० डिसेंबर २०२५ रोजी मंजुरी दिली. पशुवैद्यकीय अधिकारी गौरव श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखाली ग्रीन्स झुलॉजिकल रेस्क्यू ॲण्ड रिहॅबिलिटेशन सेंटर वनतारा जामनगर गुजरात येथील २५ सदस्य पथक ६ मार्च २०२६ रोजी जुन्नर मध्ये दाखल झाले आहे . अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक वन्यजीव पश्चिम प्रदेश डॉ . जितेंद्र रामगावकर, वनसंरक्षक पुणे आशिष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राप्त परवानगी मधील ५० पैकी २० बिबट्यांना त्यामध्ये १० नर व १० मादी वनताराच्या वातानुकूलित व सुसज्ज रेस्क्यू व्हॅनमध्ये यशस्वीरित्या दिनांक ७ मार्च २०२६ रोजी पाठवण्यात आले . सदर बिबट्याची सुरक्षितपणे स्थलांतर करण्यासाठी पशुवैद्यकीय खबरदारी घेणार आहे. उपवन संरक्षक प्रशांत खाडे , उपवन संरक्षक जुन्नर वन विभाग लोकेश पाटील उपवनसंरक्षक स्मिता राजहंस सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे वाडॅल्ड लाईफ एस ओ एस स्टाफ इतर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत ५० बिबट्यांना जामनगर गुजरात येथे पाठवले आहेत .

# कर्जमाफी हा खूप मोठा शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक निर्णय - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**इंदापूर : (समर्थ गांवकरी)**




शेतकऱ्यांना 30 सप्टेंबर 2025 पर्यंत ज्या शेतकऱ्यांची थकबाकी आहे त्यांना 2 लाख रुपये आणि प्रोत्साहन पूर्व चालू बाकी शेतकऱ्यांना 50 हजार रुपये असा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल आपण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, स्वर्गीय अजितदादा पवार ,उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार या सर्वांचे आभार मानले पाहिजे यांनी खूप मोठा शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक निर्णय घेतला. अशा शब्दात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी निमगाव केतकी येथे कृषी उत्पन्न बाजार समिती इंदापूर उप बाजार समिती निमगाव केतकीच्या एचपी कंपनीचा पेट्रोल पंपाच्या भूमिपूजन प्रसंगी बोलताना आपले मत व्यक्त केले. तसेच मंत्री भरणे पुढे म्हणाले की,उजनीच्या पाण्यावरील चांडगाव आणि पोमनवाडी पुलाचा निर्णय हा अशक्य गोष्ट होती परंतु स्वर्गीय अजितदादांनी आपल्याला शब्द दिला होता आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या सूचनेला लगेच होकार दिला. आणि त्यांनी अशक्य ही शक्य गोष्ट केली आणि तो पूल मंजूर केला. इंदापूरच्या जनतेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांचे आभार मानतो.

इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समिती ही आप्पासाहेब जगदाळे व त्यांच्याबरोबर जे जे चेअरमन झाले व्हॉइस चेअरमन झाले. संचालक मंडळ झाले त्यांनी अतिशय उत्कृष्ट काम केले. एकाही रुपयाची कर्ज या मार्केट कमिटी वरती नाही. जसं पुलाचं आश्चर्यकारक गिफ्ट दिलं होतं तसंच गिफ्ट मी निमगाव केतकीकरांना आश्चर्याचं गिफ्ट येत्या दोन महिन्यात देणार आहे आणि त्याचा फायदा येथील मार्केट कमिटी ला सुद्धा होणार आहे. यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, नगराध्यक्ष भरतशेठ शहा,पुणे जिल्हा परिषदेचे गटनेते श्रीमंत ढोले, मा प्रताप पाटील, हनुमंत कोकाटे, सचिन सपकळ,बाजार समितीचे सभापती तुषार जाधव, उपसभाती मनोहर ढूके, अर्बन बँकेचे चेअरमन गोविंद रणवरे, ,पंचायत समिती सदस्य जयकुमार कारंडे, बापूराव शेंडे, सागर भिसे,ज्येष्ठ नेते दत्तात्रेय घोगरे,ज्येष्ठ नेते देवराव जाधव, वसंतराव मोहोळकर,सीमाताई काळंगे महिला राष्ट्रवादी काँग्रेस उपाध्यक्ष, पुणे जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी महिला काँग्रेस निलोफर पठाण ,रहनाताई मुलानी,राहुल जाधव, किरण बोरा, तात्यासाहेब वडापुरे, नगरसेवक शकील सय्यद, अक्षय सूर्यवंशी, प्रशांत उंबरे,

तसेच बाजार समितीचे संचालक विलास माने, दत्तात्रेय फडतरे, मधुकर भरणे, रोहित मोहळकर, अनिल बागल, आबा देवकाते, संग्रामसिह निबाळकर, दशरथ पोळ, संतोष गायकवाड, संदीप पाटील, रोनक बोरा, सुभाष दिवसे, बिके शिवरकर,संतोष देवकर , सचिन खामगळ, इत्यादी उपस्थित होते. याप्रसंगी शेतकऱ्यांची कर्जमाफी केल्याबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने कृषिमंत्री दत्तात्रय भरणे तर पुणे जिल्हा परिषद च्या गटनेतेपदी श्रीमंत ढोले यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

# जागतिक महिला दिनी डोंबिवलीत विश्वविक्रमाची नोंद

- ९ हजार १११ विद्यार्थिनींनी सामूहिक लेझिम वादनाचा रचला इतिहास
- डोंबिवलीकर सांस्कृतिक परिवार, कल्याण डोंबिवली शारीरिक शिक्षक शिक्षण मंडळ आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने झाला देदीप्यमान सोहळा



**ठाणे:कल्याण : (समर्थ गांवकरी)**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने डोंबिवलीसह कल्याण तालुक्यातील ९हजार १११ महिला, विद्यार्थीनीनी एकत्र येत सामूहिक लेझीम वादनात एक जागतिक वर्ल्ड रेकॉर्ड करून डोंबिवलीच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष, आमदार रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामूहिक लेझीम वादन स्पर्धेत रविवारी येथील श्री संत सावळाराम क्रीडा संकुल या क्रीडांगणामध्ये ठाणे जिल्ह्यातील शेकडो शाळांच्या विद्यार्थीनी, महिला भगिनी आदींनी एकत्र येत ९,१११ एवढ्या मोठ्या संख्येने सामूहिकपणे लेझीम वादनाचा वर्ल्ड रेकॉर्ड केला.

या।आधी सांगलीकरांच्या नावाने हा रेकॉर्ड होता अशी माहिती गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे लंडनहून आलेले अधिकारी स्वप्नील डांगरेकर यांनी दिली. त्या ठिकाणी या आधी ७ हजार ३३८ महिलांनी एकत्र येऊन तो रेकॉर्ड रचला होता, मात्र तो रविवारी डोंबिवलीत मोडण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले. साडेपाच मिनिटांची विविध प्रात्यक्षिक सादर करून महिलांनी तो।रेकॉर्ड केला.

त्यावेळी डांगरेकर यांनी आमदार रविंद्र चव्हाण यांच्या पत्नी सुहासिनी रविंद्र चव्हाण यांच्याकडे वर्ल्ड रेकॉर्ड झाल्याचे सर्टिफिकेट, मेडल हस्तांतरीत केले. त्यावेळी रविंद्र चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानत लेझीम ही आपली संस्कृती असून ती टिकवणे हे आपले काम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाच्या वर्षी शारीरिक व्यायामावर भर देऊन जगासमोर सशक्त भारत कसा असू शकतो हे दाखवून देण्याचा संकल्प सोडला होता, त्या निमित्ताने महिला, विद्यार्थीनी आदींनी एकत्र येऊन हा अनोखा रेकॉर्ड केला याचा मला डोंबिवलीकर म्हणून प्रचंड आनंद आहे, हा रेकॉर्ड मी भारत मातेच्या चरणी समर्पित करतो असे उद्गार काढले.

यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समितीचे त्यांनी आभार मानत उपस्थित शिक्षक, विद्यार्थी आदींना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सारा आसमंत भारत माता की जय, जय श्रीराम, वंदे मातरमने दणाणून सोडला होता.

प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वर्ल्ड रेकॉर्ड केल्याचा आनंद ओसंडून वहात होता. लेझीमचा झंकार सर्वत्र निनादत होता, ढोल ताशांच्या गजरात त्या रेकॉर्डचे हजारो डोंबिवलीकरांनी स्वागत केले, आणि प्रत्येकाच्या सहभागीबद्दल कौतुक करण्यात आले. अशा दैदिप्यमान सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी पहाटेपासून डोंबिवलीकर प्रतीक्षेत होता, अखेर वर्ल्ड रेकॉर्डची घोषणा होताच प्रचंड जल्लोषात त्याचा आनंद व्यक्त करण्यात आला.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी पेंढारकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. उदय नाईक यांचा नियोजनाखाली कल्याण तालुका शारीरिक शिक्षण शिक्षक मंडळाचे अध्यक्ष प्रा. लक्ष्मण इंगळे, निवृत्त मुख्याध्यापक शिवछत्रपती पुरस्कार विजेते लेझीम चे उत्कृष्ट प्रशिक्षक अंकुर आहेर, सिस्टर निवेदिता स्कूल चे मा.क्रीडा संघटक शेटे सर, नंदलाल पवार, डोंबिवली भारत स्काऊट गाईड संस्थेचे अध्यक्ष अशोक जगताप, सचिव जगदीश उगले, अविनाश नलावडे, वाणी विद्या शाळेचे मुसळे सर, प्रवीण खाडे, सुभाष गायकवाड, सुनील पाटील, गोपाळ सूर्यवंशी, राणे सर, स्वामी विवेकानंद शाळेचे क्रीडा संघटक व लेझीम उपक्रम यशस्वी होण्यासाठी आपल्या शाळेचा मुलींचे पथकाद्वारे महत्त्वपूर्ण भूमिका साकारणारे लजपत जाधव ,विवेक ताम्हणकर,राजा कोळंबकर, महिला लेझीम पटूंसाठी मार्गदर्शक आणि जास्तीत जास्त महिलांच्या या उपक्रमात सहभाग करून घेणाऱ्या सुप्रिया नायकर, हर्षाली शिनकर, यांच्यासह आर एस पी पथक प्रमुख अधिकारी मणिलाल शिंपी व सर्व क्रीडा शिक्षक परिवार, शैक्षणिक संस्था आणि मुख्याध्यापक वर्ग तसेच कल्याण डोंबिवली उल्हासनगर भिवंडी परिसरातील सर्व विद्यार्थिनींनी अथक परिश्रम घेतले.

## दिव्यात आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान च्यावतीने महिला दिन उत्साहात साजरा



**ठाणे,दिवा : (समर्थ गांवकरी)**

दिव्यात आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान, दिवा, आगासन येथे महिला दिनानिमित्त हळदी कुंकू व लहान मुलांचे संस्कृतीक कार्यक्रम तसेच महिलांसाठी होमिनिस्टर या खेळाचे आयोजन करण्यात आले होते महिलांना प्रतिष्ठानच्या वतीने नेहमीच व्यासपीठ उपलब्ध करून स्वावंलंबी करण्यासाठी आम्ही विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन करत आहोत. अनेक महिलांना रोजगार ही उपलब्ध करून दिल असून आत्मनिर्भर करण्याचे धैर्य उराशी बाळगून महिलाना योग्य ते सहकार्य करीत आहोत असे आगरी महिला शक्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा उषा मुंडे यांनी बोलताना स्पष्ट केल आहे प्रसंगी शिल्पा मढवी, स्मिता पाटील, यमुना मुंडे, राजेश्री भिलारे, भागेश्री म्हात्रे या महिला लक्की ड्रॉ विजेत्या झाल्या आहेत तसेच या कार्यक्रमात निर्मला म्हात्रे माजी नगरसेविका, नगरसेवक बाबाजी पाटील . कॉंग्रेस महिला मोर्चा अध्येक्ष वैशाली भोसले , अनिता पवार आणि महिला सहकारी तसेच वं प्रतिष्ठाणच्या सर्व महिला वर्ग व पदाधिकारी उपस्थित होत्या. आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान उषा मुंडे यानी सर्वांचे आभार मानले. रात्री उशीरा पर्यंत उपक्रमाची रेलचेल सुरु होती.

## स्टेट बँकेच्या राहुरी शाखेत महिला दिन उत्साहात संपन्न

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

राहुरी येथील स्टेट बँकेच्या शाखेत महिला दिन उत्साहात संपन्न झाला . यावेळी स्टेट बँकेच्या कार्यालयीन महिला स्टाफ व महिला खातेदारांचा पूष्प गुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. बँकेचे शाखाधिकारी सागर वारुडे यांनी महिलांचा महिला खातेदारांचा सन्मान झाल्यानंतर बँकेच्या विविध उपक्रमांची विमा योजनांची माहिती खातेदारांना यावेळी दिली . बँकेच्या आवारात यावेळी आकर्षक अशी रांगोळी काढण्यात आली होती. या वेळी बँकेतील महिला अधिकाऱ्यांचाही सन्मान करण्यात आला . यावेळी शाखाधिकारी सागर वारुडे , विरेंदर पांडेय , अंजुम पठाण , बाबुराव चिंधे , वंदना वाघ , मयुरी बेल्हेकर , स्नेहा महाकुलकर , अमृता गायकवाड , कोमल गोपाळे , विद्या घेंबुड , रवींद्र जगताप , राहुल गावडे , सिद्धार्थ जगताप पत्रकार प्रसाद मैड आदी उपस्थित होते.

## ज्ञानशक्ती विकास वाहिनी संस्थेला राज्यस्तरीय 'महिला गौरव' पुरस्कार



**मंचरः (समर्थ गांवकरी)**

### १७ वर्षांनंतर पुन्हा राज्यस्तरीय सन्मान

महात्मा गांधी तंटामुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी व जनजागृती केल्याबद्दल २००९ मध्ये ज्ञानशक्ती विकास वाहिनी संस्थेला तत्कालीन उपमुख्यमंत्री Ajit Pawar यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला होता. तब्बल १७ वर्षांनंतर त्यांच्या पत्नी व सध्याच्या उपमुख्यमंत्री Sunetra Pawar यांच्या हस्ते संस्थेला पुन्हा सन्मान मिळणे हा संस्थेसाठी विशेष योगायोग ठरला आहे.

आंबेगाव तालुक्यातील महिला व युवतींच्या सर्वांगीण विकासासाठी गेली दोन दशकांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या ज्ञानशक्ती विकास वाहिनी संस्थेच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी गार्गी काळे-वळसे पाटील यांना राज्य महिला आयोगाच्या वतीने राज्यस्तरीय 'महिला गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

जागतिक महिला दिनानिमित्त शनिवारी (ता.७) मुंबई येथील दादरमधील Ravindra Natya Mandir येथे आयोजित कार्यक्रमात राज्याच्या उपमुख्यमंत्री Sunetra Pawar यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रमाणपत्र व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर मुंबईच्या रितू तावडे, आमदार Manisha Kayande, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, लक्ष्मण मानकर, पुणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रोहिणी ढवळे, रोहिणी पडवळ, प्रियंका गजमल, यश आलं खानविलकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

ज्ञानशक्ती विकास वाहिनी संस्था गेली वीस वर्षे महिला व युवतींच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेच्या पुढाकारातून मुलींच्या समुपदेशनासाठी पुणे शहर पोलीस आयुक्तालय तसेच नारायणगाव व यवत पोलीस ठाण्यात 'बालस्नेही पोलीस कक्ष' उभारण्यात आले आहेत. तसेच महिलांना बेडसाईड केअर, ब्युटी पार्लर, टेलरिंग, अन्नप्रक्रिया आदी क्षेत्रांमध्ये मोफत प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

संस्थेच्या माध्यमातून आंबेगाव तालुक्यातील ९८ शाळांमधील चार हजारांहून अधिक विद्यार्थिनींना 'गुड टच-बॅड टच' विषयावर जनजागृती करण्यात आली असून ४५० विद्यार्थिनींना स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

## पत्रकारांच्या अडचणी आणि प्रश्न सोडवण्यासाठी सकारात्मक

- विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे
- राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समिती सदस्यांशी साधला संवाद




**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत. बदलत्या परिस्थितीत वास्तवाचे भान ठेवून पत्रकारांना येणाऱ्या अडचणी आणि प्रश्न सोडवण्यासाठी सकारात्मक असल्याचे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी केले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींना कायमस्वरूपी प्रशिक्षण केंद्र नागपूर येथे सुरू करण्याबाबत निश्चितपणे विचार केला जाईल, असे त्यांनी सांगितले. शिर्डी येथे राज्य वृत्तपत्र व प्रसारमाध्यम अधिस्वीकृती समितीची दोन दिवसीय बैठक सुरू आहे. यावेळी विधानपरिषद सभापती प्रा. शिंदे यांनी समिती सदस्यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी समितीचे अध्यक्ष यदु जोशी आणि माहिती संचालक डॉ. गणेश मुळे यांनी त्यांचा सत्कार केला. याप्रसंग राज्य समिती सदस्य नवनाथ दिघे, प्रकाश कुलथे, नाशिक विभागीय समितीचे अध्यक्ष सुधीर लंके तसेच राज्य समितीचे सदस्य उपस्थित होते. विधानपरिषद सभापती प्रा. शिंदे म्हणाले, सर्वांना न्याय देण्याचे काम पत्रकार करत आहेत. या क्षेत्राचे महत्त्व अबाधित ठेवाण्यासाठी पत्रकारितेतील मूल्ये टिकवून ठेवण्याची गरज आहे. भविष्यकाळातील गरजा, निकड, पत्रकारांच्या गरजा ओळखून समितीने त्यासाठी पाठपुरावा करावा, त्यासंदर्भात आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

बदलत्या परिस्थितीत आता प्रत्येक नागरिक हा पत्रकार झाला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून तो व्यक्त होत असतो. अशावेळी, पत्रकारांनी सकारात्मक दृष्टिकोनातून काम करणे, वंचिताना न्याय देण्याचे काम सुरू ठेवावे, असे प्रा. शिंदे यांनी सांगितले. यावेळी समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी समितीच्या कामकाजाची माहिती दिली. नागपूर येथील विधानभवन अधिवेशन काळ वगळता इतर वेळी बंद असते. अशावेळी त्याठिकाणी स्थानिक स्वराज संस्था देशपातळीवर प्रशिक्षण केंद्र असावे आणि तिथेच स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधिमंडळ कामकाजाचे वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांसाठी असावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी विधानपरिषद सभापती प्रा. शिंदे यांच्या हस्ते महिला दिनानिमित्त राज्य अधिस्वीकृती समिती सदस्या सविता हरकरे आणि नेहा पुरव यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. मुळे यांनी आभार व्यक्त केले.

## गौरी जोशी, डॉ. अमृता चांदोरकर यांना यंदाचे महिला उद्योजिका पुरस्कार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचा उपक्रम असलेल्या याज्ञवल्क्य उद्योजक विकास अभियान (युवा) तर्फे महिला उद्योजिका पुरस्कार २०२६ वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्यांतर्गत वितरित होणारा स्वयंसिद्धा पुरस्कार जी.आर. इंजिनिअरींगच्या संचालिका गौरी जोशी यांना आणि युवा उद्योजिका पुरस्कार निरामय वेलनेसच्या संचालिका डॉ.अमृता चांदोरकर यांना प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेच्या माणिक सुपेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## ठाण्यात जागतिक महिला दिनानिमित्त वृत्तपत्र विक्रेत्या महिलांचा गौरव

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**




जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून, ठाणे जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघातर्फे रविवारी भल्या पहाटे ५:३० वाजता ठाणे स्टेशन परिसरात एका आगळ्यावेगळ्या 'महिला सन्मान सोहळ्याचे' आयोजन करण्यात आले होते. उन्हाळा, पावसाळा असो वा कडाक्याची थंडी, पहाटेच्या अंधारात घराबाहेर पडून घराघरात ज्ञान पोहोचवणाऱ्या महिला वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कष्टाची दखल घेऊन हा सन्मान करण्यात आला. वृत्तपत्र विक्रेत्यांना पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. पहाटेच्या वेळी जेव्हा शहर निद्रावस्थेत असते, तेव्हा आपल्या कर्तव्याला प्राधान्य देणाऱ्या या महिलांचा उत्साह पाहून उपस्थितांनी त्यांचे टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. प्रसंगी ठाण्याचे उपमहापौर कृष्णा पाटील यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. यावेळी बोलताना त्यांनी महिला वृत्तपत्र विक्रेत्यांच्या जिद्दीचे आणि मेहनतीचे कौतुक केले. "शहराच्या प्रगतीत आणि माहिती पोहोचवण्याच्या कार्यात या भगिनींचे योगदान अत्यंत मोलाचे आहे," असे गौरवोद्गार त्यांनी काढले. या सोहळ्याला संघटनेचे कार्याध्यक्ष राजेश मोरे, 'शब्दमुद्रा' वृत्तपत्राचे संपादक प्रफुल वाघुले, ठाणे जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघाचे सरचिटणीस अजित पाटील, शहर प्रमुख नंदू देशपांडे, ठाणे स्टेशन विभाग प्रमुख संदीप आवारे, चंद्रकांत पवार, राजू शेलार, नंदू करले, सखाराम चव्हाण, संजय भुजबळ, शंकर पाटील आणि ज्येष्ठ विक्रेते विठ्ठल गांगुर्डे यांसह अनेक पदाधिकारी व विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिवंडीतील शिक्षकांसाठी रस्ते सुरक्षा कार्यक्रमाचा सांगता समारंभ संपन्न

**ठाणे:कल्याण : (समर्थ गांवकरी)**

सिटीझन्स असोसिएशन फॉर चाईल्ड राइट्स (CACR)* आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ते सुरक्षा व School Health & Wellness या विषयांवर गेल्या वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत शिक्षकांसाठी एकदिवसीय रस्ते सुरक्षा व School Health & Wellness विषयक प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करून त्यांना या विषयाचे ॲम्बेसेडर बनविण्यात आले. तसेच शालेय विद्यार्थ्यांमध्ये संदेशवाहक (Messengers) तयार करणे, समाजामध्ये पालक सभा व ग्रामसभा घेणे आणि विविध संबंधित घटकांशी संवाद साधून रस्ते सुरक्षा उपक्रमात त्यांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न CACR संस्थेद्वारे करण्यात आला.

या उपक्रमाचा सांगता समारंभ आठगाव विद्यामंदिर, कोनगाव येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला कोनगाव पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व कर्मचारी, भिवंडी रस्ते व वाहतूक शाखेचे अधिकारी, आरोग्य विभागातील कर्मचारी तसेच वर्षभर या उपक्रमात सहभागी असलेल्या 32 शाळांतील शिक्षक उपस्थित होते. तसेच युनिसेफकडून श्री. निलेश गंगवारे (युनिसेफ सल्लागार) उपस्थित होते.





कार्यक्रमाची सुरुवात भिवंडी वाहतूक विभागाचे अधिकारी श्री. सुधाकर यादव यांनी उपस्थितांना संबोधित करून केली. त्यांनी युनिसेफ आणि CACR यांनी सुरू केलेल्या कार्याचे कौतुक केले तसेच या उपक्रमाची व्याप्ती अधिक वाढावी अशी अपेक्षा व्यक्त केली. आपल्या भाषणातून त्यांनी रस्ते अपघात वाढण्यामागील विविध प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कारणे स्पष्ट केली आणि त्यांचा एकमेकांशी असलेला संबंध उलगडून सांगितला. तसेच कायद्याची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींबाबतही त्यांनी माहिती दिली. यानंतर कोनगाव पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नेताराम मस्के यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की समाज शिक्षित झाला असला तरी रस्ते अपघात कमी करण्यासाठी त्याचा पुरेसा उपयोग झालेला दिसत नाही. म्हणूनच सुसंस्कारित आणि सकारात्मक विचार करणारे नागरिक बनण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच एन एस एस,एन सी सी व आर एस पी सारख्या संस्थांचा योग्य प्रकारे उपयोग करून घेण्याचा सल्ला दिला. त्यांनी दिल्ली शहराचे उदाहरण देत सांगितले की तेथे वाहन चालक आणि प्रवासी दोघेही हेल्मेटचा वापर करतात, मात्र आपल्या शहरात अनेकजण नियमांचे पालन करत नाहीत, त्यामुळे अपघातांची संख्या वाढते. याशिवाय वाहनाचे मेंटेनन्स, टायरची अवस्था, टायरमधील हवा आणि इंजिनची देखभाल यांचाही रस्ते सुरक्षेशी संबंध असल्याचे त्यांनी सांगितले. रस्ता सुरक्षा अभियान विभागीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) डॉ. मनिलाल शिंपी यांनीही CACR आणि युनिसेफ यांच्या कार्याचे कौतुक केले. विद्यार्थी शिक्षकांचे ऐकतात आणि पालक मुलांचे ऐकतात, त्यामुळे शाळेत विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षेचे योग्य संस्कार देण्याची जबाबदारी शिक्षकांनी घ्यावी असे त्यांनी सांगितले. यानंतर CACR संस्थेच्या कर्मचारी श्रीमती लक्ष्मी जावीर यांनी गेल्या वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध जनजागृती कार्यक्रमांचा आढावा सादर केला. ग्रामपंचायत, अंगणवाडी, शालेय रस्ते सुरक्षा समिती आणि आरोग्य केंद्रांना या उपक्रमात कसे सहभागी करून घेतले याबाबत माहिती दिली. तसेच शारदा विद्यालय पडगा, गोवे ZP शाळा, आदर्श विद्यालय कुरुंद, KME शाळा पडगा आणि पडगा उर्दू शाळा यांनी रस्ते सुरक्षेसाठी केलेल्या उपक्रमांची माहिती देत इतर शाळांनीही अशा उपाययोजना अमलात आणाव्यात असे आवाहन केले.

तसेच शाळांमध्ये करण्यात आलेल्या School Safety Audit चे महत्त्वपूर्ण निष्कर्षही सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून कोणत्या कमतरता आढळून आल्या यावर सखोल चर्चा करण्यात आली आणि त्या कमतरता कशा कमी करता येतील याबाबतही विचारमंथन करण्यात आले. यानंतर जीवनदीप महाविद्यालयाच्या NSS गटाने "कुणीतरी घरी वाट पाहत आहे" या रस्ते सुरक्षा विषयावरील पथनाट्याचे सादरीकरण केले.

त्यानंतर कोनगाव येथील शालेय विद्यार्थ्यांनी "घंटा वाजली घणघण, रस्त्याच्या कडेनं चालायचं" हे रस्ते सुरक्षा विषयक गीत सादर केले. यानंतर आठगाव विद्यामंदिर, कोनगाव येथील विद्यार्थिनी कु. गौरी गडदे, कु. शुभ्रा आणि कु. रिशिता हिरे यांनी CACR संस्थेमार्फत गेल्या वर्षभरात मिळालेल्या रस्ते सुरक्षा विषयक ज्ञानाबाबत आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षक प्रतिनिधी श्री. रविंद्र तारे यांनीही आपले मनोगत व्यक्त करत सर्व शिक्षकांनी रस्ते सुरक्षा हा विषय शाळेच्या परिपाठात समाविष्ट करून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रशिक्षणात सहभागी झालेल्या सर्व शाळांना प्रमाणपत्र देण्यात आले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी, पोलीस कर्मचारी व वाहतूक विभागाचे कर्मचारी असे एकूण 75 जण उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी संजय अस्वले यांनी आदेश काढून शाळांना सहभागाची सूचना केली होती. तसेच सिटीझन्स असोसिएशन फॉर चाईल्ड राइट्स संस्थेचे संचालक नितीन वाधवानी तसेच श्रीमती लक्ष्मी जावीर, श्रीमती शीतल पटेल, विनायक पतकी, शिमोन खंडागळे आणि नकुल विशे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# हंडाभर पाणी खडतर प्रवास प्रशासनाला पाझर फुटेना : गावकरी लक्ष देईना

- म्हसवंडी गावच्या आदिवासी महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरेना..!
- अबाल, वृद्ध, अंध, महिला, पुरुषांच्या डोक्यावर पाण्याचा हंडा.!
- आदिवासींकडे गावकरी लक्ष देईना.!शासन आंधळ झाल.!
- योजनांचा बोजवारा.!आंधळ दळतंय कुत्र पीठ खातंय.!



**घारगाव : (समर्थ गांवकरी)**

एकीकडे भारत देशाने ७८ वा. स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.देश तंत्रज्ञान युगात उल्लेखनीय प्रगती करत असताना संगमनेर तालुक्यातील पठार भागातील पाणलोट क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावून विविध बक्षीसात पात्र ठरलेलं एक आदर्श गाव म्हसवंडी आहे.परंतु याच गावांतर्गत असलेल्या आदिवासी वाड्या वस्त्यांवरील साधारण दीड हजार आदिवासी समाजाच्या अबाल,वृद्ध, महिला,पुरुषांच्या पिढ्यानपिढ्या डोक्यावरील हंडा उतरवता आला नसल्याचे भयाण सत्य समोर आले आहे.आज येथील आदिवासी समाजाला हंडाभर पाण्यासाठी एक ते दोन किलोमीटर पर्यंत पायपीट करत डोक्यावर पाणी आणावे लागत असल्याची गंभीर परिस्थिती समोर आली असून पाण्यासाठी करावी लागणारी वणवण कधी थांबणार तर आमच्या डोक्यावरील हंडा कधी उतरणार.? असा गंभीर सवाल आदिवासी समाज उपस्थित करत आहे. म्हसवंडी गावातील वाजेवाडी, ब्राह्मणदरा ,मळादेवी मंदिर परिसरातील साधारण दीड हजार लोकवस्तीचे आदिवासी समाजाच्या वाड्या वस्त्या आहेत.येथील आदिवासी समाजातील तरुण,महिला,पुरुष यांना एका बाजूला पोटाची खळगी भरण्यासाठी आजुबाजूच्या गावातील शेतकऱ्यांच्या बांधावर मोलमजुरीसाठी जावे लागते.तर वाड्या वस्त्यांवरील आदिवासी महिला,पुरुष,लहान मुले,वयोवृद्धांचा वर्षानुवर्षे पाण्यासाठी सुरू असलेला संघर्ष संपत नाही.सकाळ संध्याकाळ त्यांना पाणी आणण्यासाठी तर हंडाभर पाण्यासाठी पायपीट करावी लागत असल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे. यापूर्वी म्हसवंडी गावाचे ग्रामसभेत बोअरवेल साठी बंदीचा ठराव मंजूर करण्यात आला आहे.परंतु आदिवासी समाजाच्या वाड्या वस्त्या डोंगर भागात व उंचीवर असल्याने उन्हाळा जवळ आला की पाण्याचे स्रोत आटले जातात. यामुळे पाण्यासाठी वणवण करावी लागते.यापूर्वी जलजीवनची कामे झाली परंतु पाणी पोहचले नाही. आता सद्या हर घर जल योजनेचे काम सुरू आहे.परंतु शासकीय योजना म्हणजे आंधळ दळतंय अन् कुत्र पीठ खातंय अशी परिस्थिती झाली आहे.येथील आदिवासी समाजाला शासकीय योजनांपासून वंचित राहावे लागत आहे. अधिकारी फक्त पगारपुरते काम करतात. सजेवर हजर नसतात.त्यामुळे शासकीय योजनांचा बोजवारा वाजला आहे. ब्राह्मणदरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,अंगणवाडीसाठी देखील पाणी पुरविण्यासाठी शासन,प्रशासन,ग्रामपंचायत असफल ठरले आहे.येथील शालेय विद्यार्थी देखील पाणी वाहताना दिसत असून त्यांनी अभ्यास कधी करायचा.पाणी टंचाईने येथील काही कुटुंब स्थलांतरित झाली आहे.येथील अंध महिला देखील पाण्यासाठी वणवण करत आहे.शासकीय योजना तर दूरच परंतु प्रशासकीय यंत्रणेचे सबंधित अधिकारी देखील गायब झाले आहे.ग्रामसेवक,तहसीलदार, गटविकास अधिकारी फक्त नावाला उरले आहे.त्यांना खुर्ची सुटत नसल्याने सर्वसामान्यांचे प्रश्न सुटत नसल्याचा आरोप आदिवासी समाज करत आहे.

आदिवासी समाजाचा पाण्याचा प्रश्न न सुटल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलनाचा इशारा आदिवासी महिलांनी दिला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील म्हसवंडी गाव हे पाणलोट क्षेत्र विकासाचे एक आदर्श मॉडेल म्हणून ओळखले जाते. जिथे लोकसहभागातून आणि वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट (WOTR) संस्थेच्या मदतीने जलसंधारणाची उत्कृष्ट कामे करण्यात आली.एकता मित्रमंडळ आणि ग्रामस्थांच्या मेहनतीमुळे तर लोकसहभागातून हे गाव शाश्वत पाण्याचे उत्तम उदाहरण बनले आहे.गावातील तरुणांनी आणि ग्रामस्थांनी श्रमदानातून पाणलोट विकासाचे काम केले आहे. WOTR संस्थेच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रोक्त पद्धतीने पाण्याचे नियोजन व भूजल संवर्धन करण्यात यश आले.हे गाव पाणलोट क्षेत्र विकासासाठी एक 'मॉडेल' म्हणून विकसित झाले आहे. परिसरात चराईबंदी आणि कुऱ्हाडबंदी,बोरबंदी सारखे नियम पाळून निसर्ग संवर्धनाला चालना दिली गेली आहे. सह्याद्रीच्या पर्जन्यछायेच्या प्रदेशातील गावांसाठी एक आदर्श गाव मानले जाते.

गावात बोअरवेल बंदीचा पूर्वी ठराव झालेला आहे.सद्य स्थितीत माझे मालकीचे विहिरीवरून पाणी वाहण्यास परवानगी दिली आहे.आदिवासी समाजाला पाणी वाहण्यासाठी जो त्रास होत आहे.त्यावर योग्य उपाय योजना करून त्यांना पिण्यासाठी पाणी घरापर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करू.

**- सरपंच मंगेश बोडके**

वर्षानुवर्षे आमचा समाज डोक्यावर पाणी वाहतो आहे. त्यात आंधळी पांगळी,लहान मुले,महिला पुरुष डोक्यावर पाणी वाहतो आहे. पोटासाठी मोलमजुरीने जावं लागत. गाव फक्त गावापुरती सुविधा करत आहे. वाड्या वस्त्या आजही वंचित आहे.सरपंच,उपसरपंच, ग्रामसेवक,तहसीलदार, गट विकास अधिकारी लक्ष देत नाही.हे फक्त नावापुरते आहे.पाणी प्रश्न न मिटल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करू.

**- आदिवासी महिला रोहिणी काळे**

## 'महेश इंडस्ट्रियल ग्रुपकडून कर्तृत्ववान उद्योजकांचा सन्मान




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

उद्योग, नवसंकल्पना आणि सामाजिक नेतृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी महेश इंडस्ट्रियल ग्रुप यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला पुरस्कार वितरण सोहळा पुण्यातील पी.वाय.सी. हिंदू जिमखाना येथे उत्साहात पार पडला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उद्योजक आणि मान्यवर व्यक्तिमत्त्वांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूर येथील झंवर समूहाचे कार्यकारी संचालक नीरज झंवर उपस्थित होते. त्याच बरोबर जितेंद्र लखोटिया, श्यामसुंदर भुताडा, सागर राठी उपस्थित होते. उद्योग, व्यवसाय, प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना या सोहळ्यात विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यावर्षी 'उत्कृष्ट उद्योजक' ईश्वर लड्ढा, 'उत्कृष्ट उद्योजिका' दीपिका माहेश्वरी 'सर्वोत्तम व्यावसायिक कार्यकारी' आशिष भट्टाड, 'सर्वोत्कृष्ट नवोन्मेष पुरस्कार' रिशभ तोतला, नेक्स्ट जेन बिझनेस लेगसी पुरस्कार कुश राठी, 'उत्कृष्ट नागरी सेवा पुरस्कार' पुणे येथील आयकर विभागाचे संयुक्त आयुक्त पुनित डागा यांना प्रदान करण्यात आला. सर्व मान्यवरांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे नीरज झंवर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, उद्योग क्षेत्रात यश मिळविण्यासाठी केवळ भांडवल पुरेसे नसते; त्यासाठी दूरदृष्टी, सातत्यपूर्ण परिश्रम आणि समाजाप्रती असलेली बांधिलकीही आवश्यक असते. आज सन्मानित झालेली व्यक्तिमत्त्वे तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. अशा प्रकारचे सन्मान सोहळे उद्योजकतेला चालना देतात आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्यास मदत करतात. या पुरस्कार सोहळ्याच्या आयोजनात पुरस्कार समिती रश्मी भट्टड, रितू डालिया, कीर्ती लखोटिया, आशिष डालिया, निलेश लड्डा, नेहा लड्डा, कोहिनूर इंदाणी, नीरज मंत्री, उमेश धूत, अश्विन चांडक, मनीष राठी, प्रदीप राठी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उद्योग, व्यवसाय आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा गौरव करणारा हा सोहळा पुण्यातील उद्योगविश्वासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरला, असे आयोजकांनी सांगितले.

## खासदार निलेश लंके यांच्या इशाऱ्याने प्रशासन जागे

- हद्द निश्चितीच्या लेखी आश्वासनानंतर जामखेडमधील साखळी उपोषण मागे
- शहरातील अतिक्रमणांच्या प्रश्नावर सा.कार्य. अवधूत पवार यांच्या आंदोलनाला अखेर यश

**जामखेड तालुका: (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय महामार्गाच्या कामातील अनियमितता व शहरातील अतिक्रमणांच्या प्रश्नावर सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला अखेर यश मिळाले असून प्रशासनाने हद्द निश्चिती करून अतिक्रमण हटविण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर साखळी उपोषण मागे घेण्यात आले आहे. खासदार निलेश लंके यांच्या कडक इशाऱ्यानंतर अधिकारी तातडीने जामखेडमध्ये दाखल झाल्याने हा निर्णय घेण्यात आला.जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण व अपूर्ण कामामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी अमरण उपोषण सुरू केले होते. आंदोलनाला पाठिंबा देत शुक्रवारी जामखेड शहरात कडकडीत बंदही पाळण्यात आला होता. दरम्यान खासदार निलेश लंके यांनी उपोषणस्थळी भेट देत आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. तसेच अधिकारी जामखेडला येऊन हद्द निश्चितीचे काम सुरू करत नसतील तर पुणे येथील राष्ट्रीय महामार्ग कार्यालयासमोर स्वतः अमरण उपोषणाला बसण्याचा इशाराही दिला. या इशाऱ्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले.



यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी, प्रांताधिकारी व नगरपरिषदेचे अधिकारी जामखेड येथे दाखल झाले. तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत पंचदेवालय मंदिर, कोठारी पंप ते साकत फाटा या दरम्यान राष्ट्रीय महामार्गाची हद्द निश्चित करून त्या हद्दीत महामार्गाचे काम पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच हद्दीतील अतिक्रमण काढण्याची जबाबदारी राष्ट्रीय महामार्ग विभागाची असून हद्दीबाहेरील अतिक्रमणे नगरपरिषद काढणार असल्याचे ठरले.हद्द निश्चितीचे काम २४ मार्च २०२६ पूर्वी पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाने दिले आहे. त्यानंतर अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू करण्यात येणार असून महामार्गाचे उर्वरित कामही पूर्ण करण्यात येणार आहे. या आश्वासनानंतर सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांचे दोन दिवसांचे अमरण उपोषण तसेच दहा दिवसांपासून सुरू असलेले साखळी उपोषण मागे घेण्यात आले.बैठकीला प्रांताधिकारी नितीन पाटील, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अभियंता संजय शेळके, मुख्याधिकारी अजय साळवे, पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी शशिकांत सुतार, भुमी अभिलेख विभागाचे अनंत पाटील, नायब तहसीलदार प्रदीप पांडुळे, आंदोलनकर्ते अवधूत पवार यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.कर्जत-जामखेड मतदारसंघात दोन आमदार असतानाही जामखेड शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. आमदार राम शिंदे व रोहित पवार यांनी या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याची टीका स्थानिक पातळीवर होत होती.मात्र सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांच्या साखळी उपोषणाला खासदार निलेश लंके यांनी पाठिंबा देत प्रशासनाला थेट इशारा दिल्यानंतर अधिकाऱ्यांची धावपळ उडाली. अधिकाऱ्यांनी जामखेडमध्ये येऊन हद्द निश्चितीचे लेखी आश्वासन दिल्यामुळे उपोषण मागे घेण्यात आले.

## विलास दरेकर रयतसेवकांतील दीपस्तंभ : डॉ. भाऊसाहेब दांगडे

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे उपशिक्षक मा. श्री. विलास नबाजी दरेकर यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभ व कृतज्ञता सोहळा शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता कर्मवीर बहुउद्देशीय सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.




कार्यक्रमात बोलताना सनदी अधिकारी डॉ. भाऊसाहेब दांगडे (IAS) यांनी दरेकर सरांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी घेतलेले उपक्रम, शाळेच्या प्रगतीसाठी केलेले प्रयत्न आणि विद्यार्थ्यांमध्ये संस्कार व शिस्त रुजविण्याचे कार्य उल्लेखनीय आहे. अत्यंत शांत, संयमी व समर्पित वृत्तीने त्यांनी रयत शिक्षण संस्थेत केलेले कार्य दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मा. श्री. बाबासाहेब भोस यांनी आपल्या मनोगतातून विलास दरेकर सरांच्या ३३ वर्षांच्या प्रदीर्घ व समर्पित शैक्षणिक सेवेला उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. दरेकर सरांनी आपल्या सेवाकाळात केवळ अध्यापनापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाबरोबरच नैतिक मूल्ये आणि समाजाभिमुखता निर्माण झाली, असे मत डॉ. हेमंत धुमाळ यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मा. बाबासाहेब भोस होते. यावेळी माजी मंत्री मा. बबनरावजी पाचपुते, सनदी अधिकारी डॉ. भाऊसाहेब दांगडे (IAS), कृष्णा खोरे महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत धुमाळ, उद्योजक संजय मचे, माजी कृषी आयुक्त दादासाहेब सप्रे, नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

तसेच डॉ. सुनिलराव दापके, नवनाथ बोडखे, शहाजी मखरे, विलास लबडे, दिलीप तुपे, प्रशांत खामकर आदी मान्यवरांनीही उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. यावेळी उपनगराध्यक्ष अलका अनभुले, विजया शेलार व सचिन झगडे यांनी बांधकामासाठी देणग्या जाहीर केल्या.

या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विलास दरेकर सरांचा मानपत्र, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास माजी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'नॅशनल गांधी शिल्प बाजार' हस्तकला प्रदर्शनाचे उद्‌घाटन

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

देशभरातील पारंपरिक हस्तकलेचा ठेवा एकाच छताखाली अनुभवण्याची संधी देणाऱ्या 'नॅशनल गांधी शिल्प बाजार' या भव्य हस्तकला प्रदर्शनाचे उद्‌घाटन महाराष्ट्राचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथील अर्बन हाट येथे करण्यात आले. हे प्रदर्शन ६ मार्च ते १५ मार्च २०२६ या कालावधीत दररोज सकाळी १०.३० ते रात्री १० वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुले राहणार आहे. या कार्यक्रमाला अमृत राज (विकास आयुक्त – हस्तकला, वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार) तसेच अंशू सिन्हा (प्रधान सचिव – वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन) विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

## राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन विविध उपक्रमांद्वारे उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित व्हावा या उद्देशाने वैज्ञानिक विषयांवरील पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी दादा पाटील महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संदीप पै प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले. या स्पर्धेत सुमारे ५० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवित विविध वैज्ञानिक संकल्पना, संशोधन विषय तसेच पर्यावरणाशी संबंधित मुद्द्यांवर आधारित पोस्टर्स सादर केली. विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या 'वैज्ञानिक दृष्टिकोन, नवोन्मेष आणि शाश्वतता' या मुख्य थीमवर आकर्षक पोस्टर सादरीकरण केले. याच निमित्ताने "शैक्षणिक करिअरमध्ये संशोधनाचे महत्त्व" या विषयावर डॉ. संदीप पै यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात त्यांनी विद्यार्थ्यांना संशोधनाचे महत्त्व, वैज्ञानिक विचारसरणीची गरज आणि संशोधन क्षेत्रातील विविध संधी याबाबत माहिती दिली. "आपण आपल्या मेंदूचा योग्य वापर करून स्वतः समृद्ध बनूया आणि वैज्ञानिक जाणीवा विकसित करून राष्ट्रालाही समृद्ध करूया," असे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. प्रकाश साळवे यांनी विद्यार्थ्यांना संशोधनाचे महत्त्व आणि वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारण्याचे आवाहन केले. "विज्ञान दिन म्हणजे वैज्ञानिक शोधांचा उत्सव आहे. युवकांनी वैज्ञानिक जाणिवा प्रगल्भ करून तर्कशुद्ध विचार समाजात रुजवावा.



विज्ञान आणि शिक्षण यांचे अतूट नाते आहे. विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याची सवय निर्माण करणे आवश्यक असून वाचनातून वैज्ञानिक जाणीव अधिक प्रगल्भ होते. विज्ञानाचा उपयोग मानवी कल्याणासाठी तसेच शेतीच्या विकासासाठी व्हायला हवा," असेही त्यांनी नमूद केले.

## 'सुहाना नूर' मसाला श्रेणी सादर

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




भारतामधील वेगाने विकसित होत असलेल्या मसाले आणि फूड सोल्युशन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या प्रविण मसालेवाले यांनी आपल्या उत्पादन पोर्टफोलिओचा विस्तार करत 'सुहाना नूर' या नव्या मिश्र मसाल्यांच्या श्रेणीचे सादरीकरण केले आहे. मुघलकालीन स्वयंपाकघरांपासून प्रेरित असलेल्या या मसाल्यांच्या श्रेणीमुळे घरच्या घरी पारंपरिक मुघलाई पाककृतींचा अस्सल स्वाद अनुभवता येणार आहे. भारतीय पाककलेवर पर्शियन, पश्चिम आशियाई तसेच मुघलकालीन संस्कृतींचा प्रभाव असून मुघलाई पाककला आज भारतीय खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग बनली आहे. कोरमा, कबाब, टिक्का आणि बिर्याणी यांसारख्या पदार्थांच्या चवीमध्ये मसाल्यांच्या अचूक मिश्रणाची महत्त्वपूर्ण भूमिका असते. हीच परंपरा जपत सुहाना नूर श्रेणी विकसित करण्यात आली आहे. या श्रेणीत बिर्याणी, ग्रेव्ही आणि स्टार्टर पदार्थांसाठी खास तयार केलेले मसाले समाविष्ट आहेत. त्यामध्ये शाही बिर्याणी मसाला, बॉम्बे बिर्याणी मसाला, सिंधी बिर्याणी मसाला, चिकन कोरमा मसाला, मटण कोरमा मसाला, कडाही मसाला, आचार गोश्त मसाला, दालचा/दाल गोश्त मसाला, निहारी मसाला, शामी कबाब मसाला आणि सीख कबाब मसाला यांचा समावेश आहे. कंपनीच्या संशोधन व विकास टीमने दोन वर्षांहून अधिक काळ संशोधन करून ही मसाल्यांची श्रेणी विकसित केली आहे. मुघलाई पाककलेचा इतिहास, प्रादेशिक स्वयंपाक पद्धती आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन यांचा अभ्यास करून या मसाल्यांचे मिश्रण तयार करण्यात आले आहे.

## बारामतीत बजाज फायनान्सकडून जनजागृती कार्यक्रम

### सायबर फसवणुकीपासून सावध राहा

**बारामती : (समर्थ गांवकरी)**

डिजिटल व्यवहार वाढत असताना सायबर फसवणुकीच्या घटनांमध्येही वाढ होत असल्याने नागरिकांनी सतर्क राहून इतरांनाही सावध करावे, असे आवाहन बारामती पोलिसांनी केले आहे. याच पार्श्वभूमीवर बजाज फायनान्स लिमिटेडच्या वतीने बारामती येथे 'नॉकआउट डिजिटल फ्रॉड' या सायबर फसवणूक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

तुळजाराम चतुरचंद (टीसी) महाविद्यालयात आयोजित या कार्यक्रमात पीएसआय वर्षाराणी घाटे (पुणे ग्रामीण सायबर सुरक्षा), मानस शर्मा (डिजिटल फॉरेन्सिक आणि इन्सिडंट रिस्पॉन्स अनालिस्ट), निवृत्त एसीपी बाबर सर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान वक्त्यांनी बनावट ओटीपी, फिशिंग, डिजिटल अरेस्ट, कर्ज किंवा पेन्शनच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीच्या प्रकारांबाबत नागरिकांना माहिती दिली. वाढत्या डिजिटल व्यवहारांच्या पार्श्वभूमीवर सायबर गुन्हेगारांकडून वापरल्या जाणाऱ्या नव्या पद्धतींबाबतही जागरूकता निर्माण करण्यात आली. बारामती शहराचे पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांनी सांगितले की, अवाजवी नफ्याचे आमिष दाखवणाऱ्या कोणत्याही ऑफरपासून सावध राहणे आवश्यक आहे. नागरिकांनी स्वतः जागरूक राहून समाजातील इतरांनाही सावध केले पाहिजे, जेणेकरून आर्थिक गुन्ह्यांना आळा घालता येईल. सायबर गुन्हे शाखेच्या अधिकारी पीएसआय वर्षाराणी घाटे यांनी डिजिटल सुरक्षेबाबत मार्गदर्शन करताना सांगितले की, सायबर गुन्हेगार नवनवीन मार्गांनी फसवणूक करत असल्याने नागरिकांनी नवीन सुरक्षा फीचर्स आणि साधनांची माहिती घेणे गरजेचे आहे.




हा कार्यक्रम भारतीय रिझर्व्ह बँकेच्या २०२४ मधील एनबीएफसीसाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आयोजित करण्यात आला असून फसवणूक त्वरित ओळखणे, कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आणि जनजागृती वाढवणे यावर भर देण्यात आला आहे. या मोहिमेद्वारे बनावट व्हॉट्सअॅप ग्रुप, सोशल मीडिया अकाउंट्स आणि बनावट वेबसाइट्सच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले. नागरिकांनी ओटीपी, पिन किंवा वैयक्तिक माहिती कोणालाही देऊ नये तसेच संशयास्पद लिंक, ईमेल, क्यूआर कोड किंवा अॅप्सपासून दूर राहावे, असेही सांगण्यात आले.

बजाज फायनान्स लिमिटेडच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, ग्राहकांची आर्थिक सुरक्षितता ही आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. सोशल मीडिया, जाहिराती आणि प्रत्यक्ष संवादाच्या माध्यमातून लोकांना सातत्याने सायबर फसवणुकीबाबत जागरूक करण्याचा आमचा प्रयत्न आहे. बजाज फायनान्स ही बजाज फिनसर्व्ह लिमिटेडची उपकंपनी असून भारतीय रिझर्व्ह बँकेकडे नोंदणीकृत ठेवी स्वीकारणारी बिगर-बँकिंग वित्तीय संस्था (NBFC-D) आहे. देशभरातील हजारो केंद्रांमधून कार्यरत असलेल्या या कंपनीकडे डिसेंबर २०२५ पर्यंत ११.५४ कोटी ग्राहकांचा विश्वास असून कंपनीची व्यवस्थापनांतर्गत मालमत्ता ४.८४ लाख कोटी रुपयांहून अधिक आहे.

# अकोलेत तिथीनुसार भव्य शिवजयंती मिरवणूक

## शिवकन्या लेझीम पथकाचे लक्षवेधक सादरीकरण



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक वाद्यांच्या तालावर आणि आकर्षक सांस्कृतिक सादरीकरणांनी सजलेली तिथीनुसार भव्य शिवजयंती मिरवणूक अकोले शहरातून मोठ्या उत्साहात पार पडली. शिवसेना अकोलेच्या वतीने आयोजित या मिरवणुकीत पारंपरिक संस्कृतीचे जतन आणि छत्रपती शिवाजी महाराजांप्रती असलेली श्रद्धा यांचे प्रभावी दर्शन घडले.

राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तसेच त्यांचे फॅमिली डॉक्टर डॉ. जालिंदर भोर, श्री. मारुती मेंगाळ आणि दूध संघाचे संचालक श्री. जगनशेठ देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. शिवजयंती साजरी करताना कानठळ्या बसवणाऱ्या डी.जे. च्या कर्कश आवाजाला फाटा देत पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न शिवसेनेच्या वतीने करण्यात आला. सायंकाळी अकोले बाजारतळावरून मिरवणुकीला सुरुवात झाली. मिरवणुकीत निफाड तालुक्यातील प्रसिद्ध बॉन्ड पथकाने कलाट, ट्रेम्पेट, ढोल, ड्रम आणि ताशांच्या सुरेल नादाने वातावरण भारावून टाकले. सुमारे ४० वादकांच्या या पथकाने नवे-जुने पारंपरिक गीते तसेच शिवचरित्रावर आधारित गीते सादर केली, ज्यामुळे उपस्थितांच्या मनाला विशेष समाधान मिळत होते. मिरवणुकीचे आणखी एक प्रमुख आकर्षण म्हणजे तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत महिला शिक्षकांचे 'शिवकन्या लेझीम पथक'. या पथकात प्राजक्ता मोटे, माधवी गोरे, समता कराळे, सुनिता वलटे, राजकमल नवले, रूपाली कोकतरे, कांचन मेंगाळ, प्रज्ञा पारधी, सविता भुतांबरे, भांगरे मॅडम, सुरेखा पवार, लोखंडे मॅडम, ज्योती चौधरी, स्वप्ना पांडे, जयश्री शिंदे, उज्वला पारधी, शुभांगी मोहिते, शोभा लांडगे, मनीषा शिर्के, नीला कडाळे, सुजाता भोर आणि मीनल चासकर या शिक्षिका सहभागी झाल्या होत्या. या शिवकन्या पथकातील महिला शिक्षकांनी विविध शिवगीते आणि इतर गीतांवर अत्यंत आकर्षक लेझीम नृत्य सादर करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. लेझिम पथकातल्या सान्वी शेटे या चिमुकलीने लाठी-काठी प्रात्यक्षिक सादर केले. या पथकाच्या मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा केलेली श्रेया वाकचौरे विशेष आकर्षण ठरत होती. तसेच मिरवणुकीत आश्वनृत्य (घोडे) सादर करण्यात आले. मिरवणुकीच्या शेवटी एका टेम्पोमध्ये विद्युत रोषणाईने सजवलेला भव्य आश्वरूढ छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ठेवण्यात आला होता, ज्यामुळे मिरवणुकीची शोभा अधिकच वाढली.

### सर्वधर्म समभावाचे दर्शन

अकोले शिवसेनेच्या वतीने काढलेल्या या भव्य शिवजयंती मिरवणुकीत अकोलेतील सर्व समाजातील नागरिकांबरोबर मुस्लिम समाजातील तरुणांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. अनेक मुस्लिम तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात नृत्य करत मिरवणुकीत भाग घेतला. त्यामुळे या सोहळ्यात सर्वधर्म समभावाचे सुंदर दर्शन घडले.

# कोंढवड येथे ९ मार्च पासून हनुमान मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा व जीर्णोद्धार सोहळ्यास प्रारंभ

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**




सोमवार ९ मार्च ते सोमवार दिनांक १६ मार्च या काळात कोंढवड ( तालुका - राहुरी ) येथील हनुमान मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा व जिर्णोध्दार सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आल्याची माहिती कोंढवड ग्रामस्थ व भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली आहे .कोंढवड येथील श्री हनुमान मंदिर येथे होणाऱ्या या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये सोमवार दिनांक ९ मार्च रोजी युवराज जी महाराज देशमुख (आळंदी) , मंगळवार १० मार्च रोजी भागवताचार्य भगीरथ महाराज काळे ( सिन्नर ) , बुधवार ११ मार्च कीर्तन केसरी नरेंद्र महाराज गुरव (मालेगाव ),गुरुवार १२ मार्च वारकरी भूषण एकनाथ महाराज 70 शास्त्री (श्री क्षेत्र पंढरपूर ),शुक्रवार १३ मार्च वाणी प्रभू जगन्नाथ महाराज पाटील (शहापूर ठाणे), शनिवार १४मार्च ज्ञान सिंधू संदिपान महाराज हासेगावकर (आळंदी देवाची) रविवार १५ मार्च महामंडलिकेश्वर अमृता आश्रम स्वामी महाराज( जोशी बाबा) यांचे कीर्तन होणार आहे. तसेच सोमवार दिनांक १६ मार्च रोजी समन्वय महर्षी महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांचे काल्याचे किर्तन आणि व महा प्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे . या हनुमान मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा व जिर्णोद्धार सोहळ्यास महंत भास्करगिरी महाराज ( श्रीक्षेत्र देवगड संस्थान ),महंत उद्धव महाराज मंडलिक (श्री क्षेत्र नेवासा ), शांती ब्रह्म आदिनाथ महाराज शास्त्री (श्री क्षेत्र तारकेश्वर गड), वेदांताचार्य देविदास महाराज मस्के (श्री क्षेत्र नेवासा), महंत रामगिरीजी महाराज (येळीकर संस्थान ), भगवताचार्य अरुण महाराज पवार (श्री आळंदी देवाची ),महंत अर्जुन महाराज तनपुरे (श्री क्षेत्र ताहाराबाद देवस्थान ),महंत भागवत महाराज उंबरेकर (श्री क्षेत्र वृद्धेश्वर ),महंत आदिनाथ महाराज दुशिंग (विश्व माऊली गुरुकुल उंबरे), महंत राजेश्वर गिरीजी महाराज (श्री क्षेत्र चिंचडगाव वैजापूर ) आदी धर्माचार्य यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून या जिर्णोद्धार सोहळ्यास भाविकांनी सहभाग नोंदवावा , असे आवाहन समस्त कोंढवड ग्रामस्थ व भजनी मंडळ यांच्याकडून करण्यात आले आहे .

# एका रात्रीत आठ दुकाने फोडून चोरी करणारी टोळी मिरजगाव पोलीसांकडून १२ तासांच्या आत जेरबंद

## एकूण १ लाख १५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

कर्जत तालुक्यातील मिरजगाव पोलिस स्टेशनच्या हद्दीत एका रात्रीत आठ दुकाने फोडून चोरी करणारी टोळी मिरजगाव पोलीसांकडून अवघ्या 12 तासांचे आत जेरबंद करण्यात आली असून आरोपींकडून एकूण 1 लाख 15 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, मिरजगाव पोलीस स्टेशन हद्दीत दि. 04 मार्च रोजी सायंकाळी 8 वा. ते दि.05 मार्च रोजी सकाळी 9 वाजेच्या सुमारास मिरजगाव ते कडा जाणारे रोडवरील वीर पाटील कॉम्प्लेक्स मधील 8 दुकानांच्या पाठीमागील पत्रा कश्याचे तरी सहाय्याने उचकाटुन आतमध्ये प्रवेश केला. त्यानंतर अज्ञात आरोपींनी सोलर किटचे एकुण 13 कंट्रोलर, सीसीटीव्ही. कॅमेराचा डि.व्हि.आर, ड्रील मशिन, स्पॅनर सेट, ट्रॅक्टरचे टेप, स्पीकर वायर, कटर, रोख रक्कम असा मुद्देमाल चोरुन नेला होता. सदर घटनेबाबत अभय बाळासाहेब दळवी रा. तिखी, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपींविरुद्ध मिरजगाव पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजि.नं. 74/2026 बी.एन.एस.का. कलम 331(4), 334(1), 305, 324(4), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. मिरजगाव पोलीस स्टेशन हद्दीत एकाच रात्रीत 8 दुकाने फोडून चोऱ्या झाल्यांमुळे व्यापाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. सदर गुन्हा उघडकीस आणणेकामी जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी मिरजगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणणेबाबतच्या सूचना दिलेल्या होत्या. त्यानुसार अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलबुर्गे, कर्जतचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद्र लोखंडे यांचे सूचना व मार्गदर्शनाखाली मिरजगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक विजय झंजाड व मिरजगाव पोलीस स्टेशनचे तपास पथक सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना मिरजगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि विजय झंजाड यांना गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा हा मनोहर भीमराव पवार, रा. बीडसांगवी, ता. आष्टी, जि. बीड याने व त्याचे साथीदारांसह मिळून केला असून त्यानुसार मिरजगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि विजय झंजाड व तपास पथकातील अंमलदार यांनी आरोपी नामे- 1) मनोहर भीमराव पवार, रा. बीडसांगवी, ता. आष्टी, जि. बीड याचा शोध घेवून त्यास ताब्यात घेण्यात आले.



# चर्च ऑफ ख्राइस्ट श्रीगोंदा महिला मंडळातर्फे महिला दिन उत्साहात साजरा

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

चर्च ऑफ ख्राइस्ट, श्रीगोंदा महिला मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात महिलांना बायबलमधील संदेशांच्या माध्यमातून प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रम दोन सत्रांमध्ये आयोजित करण्यात आला होता. पहिल्या सत्रात प्रमुख वक्त्या म्हणून प्राचार्या रूपाली मायकल नदवी यांनी महिलांना संबोधित केले. तर दुसऱ्या सत्रात विशेष मार्गदर्शन मिसेस शीला सॅम्युएल कांबळे यांनी केले. दोन्ही वक्त्यांनी महिलांना समजेल अशा सोप्या मराठी भाषेत बायबलमधील अचूक उदाहरणे देत प्रेरणादायी विचार मांडले. प्राचार्या रूपाली मायकल नदवी यांनी आपल्या भाषणात स्त्रीच्या गुणांविषयी मार्गदर्शन करताना बायबलमधील अनेक स्त्रियांच्या जीवनातून शिकण्यासारख्या गोष्टी सांगितल्या. प्रेम, नम्रता, लीनता, ममता व सौम्यता हे स्त्रीचे गुण असून ते प्रत्येक स्त्रीमध्ये असणे आवश्यक आहे. तसेच स्त्रीने आपल्या जीवनात येशू ख्रिस्ताला परिधान करून त्याच्या शिकवणीनुसार जीवन जगावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी मिसेस शीला सॅम्युएल कांबळे यांनी तारणाविषयी मार्गदर्शन करताना सांगितले की, येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर बलिदान देऊन संपूर्ण मानवजातीसाठी तारणाचा मार्ग खुला केला. हे तारण आपण मिळवून ते आपल्या जीवनात टिकवून ठेवले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन सौ. मागरिट पीटर रणसिंग यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक चर्च महिला मंडळ व तरुण संघाने परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला सोलापूर, बारामती, दौंड, विसापूर, कोळगाव, शालोम व भानगाव येथील महिला मंडळांच्या प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. दुपारी स्नेहभोजनाचा कार्यक्रमही पार पडला. विविध ठिकाणांहून आलेल्या महिलांनी स्किट, गीते व इतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली आणि देवाचे गौरव केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सोलापूर येथील रेव्ह. मेहेत्रे यांनी प्रार्थना करून समारोप केला.






## iQOO Z11x १२ मार्चला लॉन्च

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

हाय-परफॉर्मन्स स्मार्टफोन ब्रँड iQOO १२ मार्च रोजी आपला नवीन स्मार्टफोन iQOO Z11x लॉन्च करण्यासाठी सज्ज आहे. विद्यार्थ्यांच्या वेगवान आणि बहुपयोगी जीवनशैलीचा विचार करून हा स्मार्टफोन विशेषतः डिझाइन करण्यात आला आहे. कॉलेजमधील लेक्चर्स, ग्रुप प्रोजेक्ट्स, कोडिंग असाइनमेंट्स, ऑनलाइन क्लासेस आणि संशोधन यांसोबतच गेमिंग, स्ट्रीमिंग आणि सोशल मीडियासाठी दीर्घकाळ टिकणारा फोन विद्यार्थ्यांना आवश्यक असतो.

# अकोलेच्या मंथन बांडे याचा महिला दिनानिमीत्त ३६ कि.मी. सागरी पराक्रम

*लाटा, भरती-ओहोटी आणि जहाजांच्या वर्दळीत मंथनचा रोमहर्षक जलप्रवास*

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील खडकी खुर्द ( ह . मु . विक्रोळी ) येथील अवघ्या दहा वर्षांच्या जलतरणपटू मंथन मुरलीधर बांडे याने धरमतर ते गेटवे ऑफ इंडिया हे तब्बल ३६ किलोमीटरचे सागरी अंतर पोहून पार करत एक प्रेरणादायी आणि रोमहर्षक कामगिरी नोंदवली आहे.

महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च रोजी रात्री २.३० वाजता मंथन ने महान समाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करून तसेच समुद्राची पूजा करून या ऐतिहासिक जलप्रवासाची सुरुवात केली. पुढील जवळपास नऊ तासांचा हा प्रवास अत्यंत आव्हानात्मक होता. समुद्रातील भरती-ओहोटीचा सतत बदलणारा खेळ, प्रचंड लाटा, मोठ्या मालवाहू जहाजांची सततची ये-जा आणि समुद्रावर पसरलेला तेलाचा तवंग अशा अनेक अडचणींचा सामना करत मंथन ने आपल्या जिद्दीने हा प्रवास सुरू ठेवला.



या सर्व नैसर्गिक आणि मानवनिर्मित अडथळ्यांवर मात करत सकाळी ११.५० वाजता त्याने गेटवे ऑफ इंडिया येथे पोहोचून हा ३६ किमीचा सागरी जलप्रवास यशस्वीरित्या पूर्ण केला. गेटवे ऑफ इंडिया येथे पोहोचल्यानंतर महाराष्ट्र हौशी जलतरण संघटनेचे निरीक्षक सुनील मयेकर यांनी अधिकृत वेळ जाहीर करताच उपस्थित मित्र, नातेवाईक, क्रीडाप्रेमी तसेच त्याच्या शाळेतील प्रतिनिधींनी मंथन चे जल्लोषात स्वागत केले. टाळ्यांचा कडकडाट, अभिनंदनाचा वर्षाव आणि उत्साहपूर्ण वातावरणात त्याच्या या पराक्रमाचा गौरव करण्यात आला. या धाडसी उपक्रमासाठी त्याला प्रशिक्षक राजू पालकर सर, रोहित चव्हाण सर, सतीश निंबाळकर सर आणि संतोष पाटील सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रशिक्षणामुळेच मंथन इतक्या कठीण परिस्थितीतही हे मोठे सागरी आव्हान यशस्वीरित्या पार केले. मंथन सध्या हरियाली व्हिलेज सीबीएसई स्कूल, विक्रोळी येथे शिक्षण घेत असून अभ्यासाबरोबरच जलतरणातही सातत्याने मेहनत घेत आहे. त्याचा नियमित सराव बीएमसी विक्रोळी येथील जलतरण तलावात होत असून, सागरी पोहण्याचा सराव करण्यासाठी तो उरण येथील समुद्रातही विशेष प्रशिक्षण घेतो. मंथन यापूर्वीही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त त्याने अटल सेतू ते गेटवे ऑफ इंडिया हे १७ किलोमीटरचे सागरी अंतर पोहून त्यांना अनोखी मानवंदना अर्पण केली होती. तसेच मालवण येथे झालेल्या १५ व्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत १० किलोमीटर आणि १ किलोमीटर स्पर्धांमध्ये त्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अवघ्या लहान वयात समुद्रातील कठीण आव्हानांना सामोरे जात ३६ किलोमीटरचा सागरी पराक्रम करणारा मंथन आज अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# गुजरात जामनगर केंद्रात ५० बिबटे स्थलांतरास परवानगी

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**




माणिकडोह बिबट निवारा केंद्राची क्षमता ५० एवढी असल्याने अतिरिक्त बिबट्याचे भारतातील इतर संरक्षित ठिकाणी स्थलांतर करणे आवश्यक होते . ५० बिबट्यांना गुजरात राज्यातील जामनगर ग्रीन्स झुलॉजिकल रेस्क्यू अ‍ॅण्ड रिहॅबिलिटेशन सेंटर वनतारा येथे स्थलांतर करण्याबाबतच्या प्रस्तावास केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण नवी दिल्ली यांनी या प्रस्तावास २० डिसेंबर २०२५ रोजी मंजुरी दिली. पशुवैद्यकीय अधिकारी गौरव श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखाली ग्रीन्स झुलॉजिकल रेस्क्यू अ‍ॅण्ड रिहॅबिलिटेशन सेंटर वनतारा जामनगर गुजरात येथील २५ सदस्य पथक ६ मार्च २०२६ रोजी जुन्नर मध्ये दाखल झाले आहे .

अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक वन्यजीव पश्चिम प्रदेश डॉ . जितेंद्र रामगावकर, वनसंरक्षक पुणे आशिष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राप्त परवानगी मधील ५० पैकी २० बिबट्यांना त्यामध्ये १० नर व १० मादी वनताराच्या वातानुकूलित व सुसज्ज रेस्क्यू व्हॅनमध्ये यशस्वीरित्या दिनांक ७ मार्च २०२६ रोजी पाठवण्यात आले . सदर बिबट्याची सुरक्षितपणे स्थलांतर करण्यासाठी पशुवैद्यकीय खबरदारी घेणार आहे. उपवन संरक्षक प्रशांत खाडे , उपवन संरक्षक जुन्नर वन विभाग लोकेश पाटील उपवनसंरक्षक स्मिता राजहंस सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे वाडॅल्ड लाईफ एस ओ एस स्टाफ इतर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत ५० बिबट्यांना जामनगर गुजरात येथे पाठवले आहेत . जुन्नर वन विभागामार्फत मानव वन्यप्राणी संघर्ष कमी करण्यासाठी विविध उपाय योजना सातत्याने राबविण्यात येत आहे नागरिकांनी वनविभागा सहकार्य करावे असे आव्हान जुन्नर वन विभागामार्फत करण्यात आले आहे .

# देशातील वाढत्या रस्ते अपघातांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

देशात वाढत्या रस्ते अपघातांच्या गंभीर समस्येकडे सरकारने तातडीने लक्ष देऊन कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत शून्यकाल उल्लेखाद्वारे केली. बेफिकीर वाहनचालक, मद्यपान करून वाहन चालवणे तसेच सोशल मीडियासाठी रस्ते व महामार्गांवर रील किंवा फोटोशूट करण्याची वाढती प्रवृत्ती ही अपघातांची नवी व चिंताजनक कारणे ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "उपलब्ध आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये देशात सुमारे १.७८ लाख लोकांचा रस्ते अपघातांमध्ये मृत्यू झाला आहे. म्हणजेच दररोज शेकडो कुटुंबांवर ही दुर्घटना ओढवते. विशेषतः १८ ते ३४ वयोगटातील तरुणांचे प्रमाण सुमारे ६० टक्के असल्याने ही बाब अधिक चिंताजनक आहे. महाराष्ट्रातही आर्थिक सर्वेक्षणानुसार, २०२४ मध्ये ३६ हजार ८४ रस्ते अपघातांची नोंद झाली असून, त्यात १५ हजार ३३५ जणांचा मृत्यू झाला आहे. पुण्यातही परिस्थिती चिंताजनक असून, पुणे पोलिसांच्या आकडेवारीनुसार २०२४ मध्ये १,४०४ अपघातांमध्ये ३२० जणांचा मृत्यू झाला, तर १,३२० जण जखमी झाले. २०२३ मध्ये ही संख्या १,२३० होती." सोशल मीडियासाठी रस्ते व महामार्गांवर रील किंवा फोटोशूट करण्याच्या वाढत्या प्रवृत्तीमुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत असून अपघातांचा धोका वाढत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले.




# श्रीगोंदा ते लोणी कंद ८३ किमी सायकल वारी

## साध्वीजी प्रीती सुधाजींना 'राष्ट्र प्रेरणा माता' पुरस्कार

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

अग्रीपंख फाउंडेशन, श्रीगोंदा यांच्या वतीने जागतिक महिला दिन आणि साध्वीजी प्रीती सुधाजी यांच्या ६४ व्या दीक्षा दिनाचे औचित्य साधून दि. ७ मार्च रोजी श्रीगोंदा ते लोणी कंद असा तब्बल ८३ किलोमीटरचा सायकल वारीचा उपक्रम उत्साहात पार पडला. रखरखत्या उन्हात काढलेल्या या सायकल वारीचे नेतृत्व साविता शिंदे आणि रेश्मा डांगे यांनी केले.

"अहिंसा परमो धर्मः" हा भगवान महावीरांचा संदेश जीवनमंत्र मानून अखंड साधना करणाऱ्या साध्वीजी प्रीती सुधाजी यांना यावेळी 'राष्ट्र प्रेरणा माता' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे हा सन्मान शाळकरी मुलांच्या हस्ते करण्यात आला.

अक्षदा पांडुळे (बाल जिजाऊ), राजनंदिनी सिनलकर (सावित्रीबाई), अनुष्का वाडगे (अहिल्यादेवी), समृद्धी घाडगे (रमाई), आरोही भोसले (शास्त्रज्ञ), कश्यप शेख (सैनिक) आणि गंगा गुप्ता (शेतकरी) या विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांची वेशभूषा परिधान करून साध्वीजींना पुरस्कार प्रदान केला. विद्यार्थिनींच्या हस्ते सन्मान स्वीकारताना साध्वीजी प्रीती सुधाजी भावूक झाल्या.

यावेळी साध्वीजी प्रज्ञाजी व जय स्मिताजी यांनी आपल्या मधुर वाणीतून प्रबोधन केले. तसेच प्रमुख पाहुण्या म्हणून सन्मानित करण्यात आलेल्या विद्यार्थिनींचा साध्वीजींनी शालेय साहित्य देऊन गौरव केला. "मी जिजाऊ, मी सावित्री बोलतेय" या विषयावर अक्षदा पांडुळे आणि राजनंदिनी सिनलकर यांनी प्रभावी विचार मांडले.



कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात नवनाथ दरेकर यांनी साध्वीजींना मानवंदना देण्यासाठी सायकल वारी का काढली, तसेच 'राष्ट्र प्रेरणा माता' पुरस्कार का प्रदान करण्यात आला आणि 'एक मुठ धान्य अनाथांसाठी' हा उपक्रम अग्रीपंख फाउंडेशन का राबवत आहे, याची माहिती दिली. रेश्मा डांगे यांनी सांगितले की, महिला दिनाचे औचित्य साधून महिलांच्या नेतृत्वाखाली सायकल वारी काढून महान तपस्वी माता प्रीती सुधाजींचा शाळकरी मुलींच्या हस्ते सन्मान करणे ही महिलांसाठी अभिमानाची बाब आहे.

यावेळी नवनीत मुनोत, नवनाथ खामकर आणि दत्ताजी जगताप यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास नवनीत मुनोत, चंद्रशेखर लुकड, संदीप मुथा, शितल गुगळे, संदीप सिनलकर, लक्ष्मण जाधव, अर्चना सोनवणे, अशोक पांडुळे, नवनाथ मांडे, नवनाथ लबडे आदी उपस्थित होते.

सायकल वारीचे रांजणगाव सांडस येथे अजित रणदिवे, वाकळी येथे काकासाहेब तापकीर आणि केसनंद येथे सचिन हरगुडे यांनी स्वागत केले. या वारीत रमेश सांळुके, अमोल गव्हाणे, नवनाथ दरेकर, नवनाथ खामकर, साविता शिंदे, रेश्मा डांगे, मनीषा काकडे, संतोषराव जाधव, विकी शिवले, संकेत गांजुरे, देविदास खेतमाळीस, जालिंदर आमले, प्रशांत एरंडे, राष्ट्रभूषण घोडके, अमोल हिरवे, संदीप जाधव, कैलास घाडगे, भगवान खलाटे, विक्रांत खलाटे, दत्ताजी जगताप, चैतन्य वाळुज, किशोर चव्हाण, बाळासाहेब काकडे आदी सायकलपटूंनी सहभाग घेतला.